विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | श्री. अचलकुमार टिल्लू |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००२ |
| वर्ष | : | पहिले |
| अंक | : | ३ |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : ४३**

MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ


व्ही. पी. एम्.


# दिशा

वर्ष पहिले / अंक ३ / फेब्रुवारी २००१







# फेब्रुवारी

४- बनारस हिंदु विश्वविद्यालयाची स्थापना -१९१६

६- पहिला मराठी बोलपट 'अयोध्येचा राजा' प्रदर्शित झाला - १९३२

८- पुण्याच्या जनरल नेटिव्ह लायब्ररीची स्थापना - १९४८

११- टॉमस अल्वा एडिसन यांचा जन्म- १८४७

१६- मानववंश शास्त्रज्ञ सर फ्रान्सीस गल्टन यांचा जन्म -१८२२

१७- वासुदेव बळवंत फडके यांची पुण्यतिथी-१८८३

१८- खगोलशास्त्रज्ञ गॅलिलीओ याचा जन्म-१५६४

२१- शांतीस्वरूप भटनागर यांचा जन्म दिवस-१८८४

२२- हेन्री माडाल्फ र्टल यांचा जन्म- १८५७

२३- गाडगे महाराजांचा जन्म-१८५७

२६- स्वातंत्र्यवीर वि.दा. सावरकर यांची पुण्यतिथी-१९६६

२७- कुसुमाग्रजांचा जन्मदिन- १९१२


२८- राष्ट्रीय विज्ञान दिन

संकलन-मानसी पाठक

# मुखपृष्ठाविषयी थोडेसे

या महिन्याच्या अंकाच्या मुखपृष्ठावर अल्बर्ट आइनस्टाइन, स्टीफन हॉकिंग, समर्थ रामदास व स्वा. सावरकर यांची चित्रे आहेत. या महिन्यात दासनवमी असल्यामुळे त्याचे औचित्य साधून त्यांची चित्रे काढली. तर २८ फेब्रुवारी हा विज्ञान दिन. डॉ. सी.व्ही. रामन् यांनी प्रकाशाच्या विकिरणाबद्दलचे त्यांचे संशोधन 'रामन् परिणाम' हे या दिवशी प्रसिद्धीस दिले. या बद्दल पुढे त्यांना नोबेल पारितोषिक प्राप्त झाले. म्हणून २८ फेब्रुवारी हा दिवस विज्ञान दिवस म्हणून साजरा केला जातो. या सी.व्ही. रामन् यांचे स्मरण म्हणून त्यांचेही चित्र आहे. तसेच नुकतेच भारतात येऊन गेलेले जगद्विख्यात शास्त्रज्ञ स्टीफन हॉकिंग यांचेही छायाचित्र मुखपृष्ठावर आहे. त्यांचे छायाचित्र देण्यामागचा उद्देश एवढाच की स्टीफन हॉकिंग हे कमालीच्या शारीरिक विकलांगतेवर मात करणाऱ्या दुर्दम्य आशेचे आणि इच्छाशक्तीचे प्रतीक. अलौकिक प्रतिभेचा आविष्कार. त्यांना मेंदूचा दुर्धर असा विकार आहे. मृत्यू सोबत घेऊन गेली ३८ वर्ष हा माणूस कार्यमग्न राहिला आहे. विश्वाच्या उत्पत्तीच रहस्य उलगडण्यात गर्क आहेत. त्यांच्या जिद्द, चिकाटी, मेहनतीचे कौतुक करावे तेवढे थोडेच. त्यांचे लेखन आणि संशोधन जगापुढे आले ते विज्ञानाच्याच किमयेतून. खास त्यांच्यासाठी बनवलेला डोळ्यांच्या इशाऱ्यावर किंवा डोक्याच्या हालचालीनुसार चालणारा संगणक. आधुनिक तंत्रज्ञान त्यांचे शब्द टिपण्यापासून त्याच ध्वनीरूप जगापुढे आणले. जय विज्ञान !

सौ. मंजिरी दांडेकर



व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष पहिले / अंक ३ / फेब्रुवारी २००१

**संपादक**
श्री. अचलकुमार टिल्लू
**कार्यकारी संपादक**
प्रा. मोहन पाठक
**सहसंपादक**
सौ. मंजिरी दांडेकर
**सहाय्यक मंडळ**
सौ. भारती जोशी
सौ. विशाखा देशपांडे
कु. दीपाली भाटकर
**कायदेविषयक सल्लागार**
ॲड. सलील बुटाला

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्यामंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२.
दूरध्वनी : ५४२ ६२ ७०
**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिन्ट्स,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे - १.
दूरध्वनी : ५३४ १२ ९१

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | | २ |
| २) | 'वेध-२०००' | सौ. विशाखा देशपांडे | ३ |
| ३) | यशाचा कानमंत्र | सौ. उषा जयंत कळमकर | ११ |
| ४) | ठाणे महानगरातील वाहतुकजन्य प्रदूषण : व्याप्ती आणि उपाययोजना | सौ. भारती जोशी | १३ |
| ५) | स्वा. सावरकर साहित्य दर्शन | शैला जोगळेकर | १५ |
| ६) | निरोप समारंभ | सौ. वंदना सं. प्रसादे | २१ |
| ७) | श्री रामदास स्वामींचे 'प्रपंच विज्ञान' - एक नितांत सुंदर प्रबंध | श्री. अचलकुमार टिल्लू | २३ |
| ८) | परिसर वार्ता | सौ. विशाखा देशपांडे | २८ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी विद्या प्रसारक मंडळ तसेच संपादक सहमत असतीलच असे नाही.

सद्गुणांसाठी दुसऱ्याकडे बघा, दुर्गुणांसाठी स्वतःवर नजर ठेवा-फुलर

# संपादकीय

आपल्याकडे प्रत्येक महिन्याचा त्याचा असा स्वतंत्र चेहरा आहे. इतिहासातील अनेक लहान मोठ्या घटना, व्यक्ती, व्यक्तींचे कर्तृत्वान आयुष्य यांच्या नोंदीमुळे प्रत्येक महिन्याला हा चेहरा प्राप्त झालेला आहे. फेब्रुवारी महिन्याचा असा विचार करीत असताना अनेक लहानमोठ्या घटना आठवतात. प्रत्येक घटनेचे व्यक्तींचे इतिहासात काही वेगळे महत्त्व आहे. इतिहासाच्या खांद्यावर उभे राहून भविष्याचा वेध घेताना वर्तमान अधिक समृद्ध करण्याच्या मानवी प्रयत्नांना या नोंदी दिशा देतात.

वर्षाचे ३६५ दिवस जर लक्षात घेतले तर प्रत्येक दिवसाचे इतिहासातील महत्त्व आगळे वेगळे असते. विसावे शतक ज्या शतकाचा रक्तलांच्छित शतक असा उल्लेख केला जातो, नुकतेच संपले. या शतकाचा अभ्यास करण्यासारखा आहे. त्या दृष्टीने एक उत्तम संदर्भग्रंथ आपल्या संस्थेच्या कला-वाणिज्य महाविद्यालयाच्या ग्रंथालयात विकत घेण्यात आला आहे. 'क्रॉनिकल ऑफ ट्वेंटिएथ सेंच्युरी' असे त्या ग्रंथाचे नाव आहे. १०० वर्षांतील ३६५०० दिवसात जीवनाच्या विविध क्षेत्रात काय घडले, जागतिक इतिहासाच्या संदर्भात त्या घटनेचे काय महत्त्व आहे, याच्या अत्यंत साक्षेपाने केलेल्या नोंदी या ग्रंथात आहेत. कालक्रमानुसार रचना असलेला हा ग्रंथ अभ्यासताना आपल्याला इतिहासाकडे पाहण्याची वेगळी दृष्टी प्राप्त होऊ शकते.

या पार्श्वभूमीवर जेव्हा फेब्रुवारीचा विचार केला जातो तेव्हा अनेक क्षेत्रातील घटनांचे महत्त्व जाणवायला लागते. अध्यात्म, धर्म तत्त्वज्ञानाचा विचार केला तर संतश्रेष्ठ नरहरी सोनार, गजानन महाराज, रामदास स्वामी या उत्तुंग कर्तृत्व असणारांचे स्मरण होते. राजकारण, समाजकारणाच्या क्षेत्रातील वासुदेवराव बळवंत फडके, गोपाळ कृष्ण गोखले, स्वातंत्र्यवीर वि.दा. सावरकर या नावांची आठवण होते. दि. २८ फेब्रुवारी हा दिवस राष्ट्रीय विज्ञान दिन म्हणून पाळला जातो. अशा अनेक आठवणींनी या महिन्याला व्यक्तिमत्त्व प्राप्त करून दिले आहे. या वेळच्या अंकात त्या दृष्टीने बरेच साहित्य वाचकांना देण्याचा प्रयत्न आहे.

'दिशा' मधील लेख आवडले, अंक खूप आवडला असे अनेकानेक वाचक मित्र प्रत्यक्ष भेटीत सांगत असतात. या सर्व वाचकांना एक विनंती की त्यांनी स्वतः या 'दिशा' च्या वाटचालीत सहभागी व्हावे. प्रत्येकजण खूप मोठा लेखक असतो असे नाही. पण या आपल्या सामान्य जीवनात 'सांगावं' असं काही घडत असतं. हे सांगण्यासाठी आपण लिहावं ही विनंती आहे. अंका बद्दलच्या प्रतिक्रिया आपण लेखी दिल्यात तर आम्हाला अधिक हुरुप येईल. दिशाची वाटचाल अधिक दिशापूर्ण करता येईल. तेव्हा आपले लेखन, आपल्या रचना, आपली मते, यासाठी आम्ही उत्सुक आहोत. दिशा अधिकाधिक वाचनीय व्हावा, संग्राह्य व्हावा यासाठी आपण ही सहकार्य करु शकता !

संपादक

# 'वेध - २०००'

*वेधपरिषद हा ठाण्याच्या जीवनातील महत्त्वाचा शैक्षणिक उपक्रम आहे. यंदाच्या परिषदेचा हा तपशीलवार वेध.*
*-संपादक*

वय वर्ष बारा ते पंधरा. कुमार वय. बाल्यावस्था सोडून किशोरावस्थेकडे झुकणारे. आडनाड- अर्धवट वय. कोणत्याही गोष्टींचं अर्धवट ज्ञान. अतिशय संवेदनाक्षम मानसिक अवस्था. जे डोळ्यांनी बघू, जे कानावर पडेल तेच मनात कायम घर करून बसेल. अशावेळी होणारे संस्कार, प्राप्त होणारं ज्ञान हे फार महत्त्वाचे ठरतं. या वयातच मुलं 'आदर्श' अशा वाटणाऱ्या गोष्टी शोधू लागतात. त्या दृष्टीने विचार करू लागतात. आणि मग मनाला पटेल, त्यांच्या चौकस बुद्धीचे समाधानकारक जे उत्तरं देऊ शकतील अशा जर व्यक्ति त्यांच्या संपर्कात आल्या तर त्या आपल्या 'आदर्श' मानून त्याच प्रवाहाच्या दिशेने वाहत जातात. मग, याच काळात योग्य संस्कार, उत्तम विचार, व्यवहार ज्ञान व योग्य निवड करण्याची क्षमता या सर्व गोष्टी आत्मसात करण्याकरता, आत्मविश्वास निर्माण करण्याकरता असे 'आदर्श' डोळ्यासमोर ठेवावे लागतात. ज्यांच्या आधारे पुढील वाटचाल पक्की करण्याकरता योग्य दिशा मिळेल, कारण या वयात योग्य दिशा मिळाली नाही तर आयुष्याला वेडेवाकडे वळण लागते आणि मग पुढे वैफल्य येते. वय सरून जातं आणि मागे वळून पहाता येत नाही.

येणाऱ्या प्रत्येक दिवसागणीक, करियरची निवड करणे, ही गोष्ट फारच गुंतागुंतीची व अवघड होऊन गेली आहे. करियरची निवड करण्यासाठी विद्यार्थ्यांच्या आणि पालकांच्या समोर वाढत्या स्पर्धेमधील जणू विस्तारीत कुरणच पसरलेले आहे. गेल्या काही वर्षांमध्ये पालकांना व विद्यार्थ्यांना अशा प्रकारची निवड करण्याकरता मार्गदर्शन करण्यासाठी ठाण्यामध्ये आय. पी. एच. म्हणजे 'इंस्टिट्यूट फॉर सायकॉलॉजिकल हेल्थ' ही संस्था कार्यरत आहे. करियरच्या दृष्टीने कोणकोणती क्षेत्र योग्य आहेत व त्याकडे कोणत्या दृष्टिकोनातून बघणं आवश्यक आहे व आपल्याला नेमके काय आत्मसात करण्याजोगं आहे हे कळण्यासाठी 'वेध' परिषदेची सुरुवात आय. पी. एच. नी केली. डिसेंबर २००० मध्ये झालेल्या या परिषदेचं हे नववं वर्ष होतं. 'सर्वांसाठी मन:स्वास्थ्य!' या आय. पी. एच. च्या तत्त्वावर आधारित 'वेध'चे आयोजन केले जाते, ज्यामध्ये वेगवेगळ्या क्षेत्रातील अनुभवी व्यक्तिंना मार्गदर्शन करण्यासाठी बोलवलं जातं. ही परिषद मनोरंजनात्मक नसून, बोधप्रद व प्रेरणादायी असते. या वर्षी दि. २ व ३ डिसेंबर या दीड दिवसांच्या सत्रामध्ये निरनिराळ्या क्षेत्रातील बारा अनुभवी मान्यवरांनी मुलांशी दिलखुलास गप्पागोष्टी केल्या आणि त्यांचे अनुभव सांगितले. परिषदेचा या वर्षीचा विषय होता 'स्वार्थ आणि समाधान' (Selfishness and satisfaction). परिषदेचे सूत्रसंचालन करीत होते स्वत: डॉ. आनंद नाडकर्णी व रविंद्र मांजरेकर. 'वेध' परिषदेचे वैशिष्ट्य असे की यामध्ये कोणताही औपचारिकपणा नसतो. पाहुण्यांचे स्वागत करण्यासाठी स्वागतगीत गायला कोणताही विशिष्ट मुलांचा गट वगैरे नसतो, तर या परिषदेला उपस्थित असलेली आठशे ते एक हजार शालेय विद्यार्थी, पालक व शिक्षक हे सर्वच जण हे स्वागतगीत गाऊन पाहुण्यांचे स्वागतही करतात व त्याच गीताने त्यांना निरोपही देतात. यासाठी कार्यक्रम सुरू होण्याआधी, डॉ. आनंद नाडकर्णी सर्वांना हे गीत शिकवतात आणि त्याची तालीम करून घेतात. या वयोगटातील एवढ्या मोठ्या संख्येतील मुलांना जागेवर खिळवून ठेवण्यात व शहाण्यासारखे



परिषदेला गर्दी करणारा उपस्थित विद्यार्थी वर्ग.

शिस्तीत वागायला लावण्यात डॉ. आनंद नाडकर्णींची हातोटी आहे. ते सर्व मुलांना, सगळ्या गोष्टींमध्ये इतके गुंतवून ठेवतात की मुलांना इतर कशाचा विचारच करावासा वाटत नाही. याबाबतीत डॉ. आनंद नाडकर्णींचे खरोखरच कौतुक करण्यासारखेच आहे. यावर्षीचे स्वागतगीत होते 'गीत गा रहे है आज हम, रागीनी को ढूंढते हुए ....' शनिवार, ३ डिसेंबरच्या सत्रामध्ये प्रथम येणारे पाहुणे होते सुप्रसिद्ध चित्रपट निर्माते श्री. श्याम बेनेगल.




सुप्रसिद्ध चित्रपट निर्माते श्री. श्याम बेनेगल उद्घाटन करताना, सोबत डॉ. आनंद नाडकर्णी

त्यांनी या परिषदेचे उद्घाटन केले. गप्पा मारताना त्यांनी सांगितले की, ''मी चित्रपट निर्माता व्हायचं हे वयाच्या सहाव्या वर्षीच ठरवलं. त्यावेळी माझ्या वडिलांकडे एक साधा कॅमेरा होता ज्याने ते आम्हा मुलांचे घरामध्ये शूटींग करीत व घरातच त्याची रिळं दाखवीत. तेव्हाच मी हे मनाशी ठरवलं की मी पण चित्रपटच काढणार. मी एक उत्कृष्ट चित्रपट निर्माता नाही झालो तरी चित्रपट निर्माता जरूर होणार. सुरुवातीला मी लेक्चरर म्हणून ६-७ महिने काम केलं. मग त्यामध्ये मन लागेना म्हणून Copy Writer म्हणून काम करायला लागलो. मग काही दिवसांनी कलकत्त्याहून मुंबईला माझे आतेभाऊ गुरूदत्त यांच्याकडे काही शिकता येईल या हेतूने आलो. त्यांच्या हाताखाली छोटी मोठी कामं करून, हळूहळू दिग्दर्शनाकडे वळलो आणि माझा पहिला जाहिरातपट १९५८ साली मी तयार केला. माझी सगळ्यात पहिली फिचर फिल्म १९७३ साली 'अंकूर' ही होती.'' त्यानंतर पंधरा वर्षात श्री. श्याम बेनेगल यांनी २३ फिचर फिल्म, सुमारे ७५ ते ८० माहितीपट आणि १२०० जाहिरातपट तयार केले. स्वत: अतिशय शिस्त पाळणारे बेनेगल, काम करताना सहकाऱ्यांकडूनही तशी शिस्तीची वागणूक अपेक्षित करतात. मधून मधून प्रश्न विचारीत असलेल्या मुलांना ते उत्तरे देत होते. 'तुम्ही आयुष्याकडे मागे वळून बघता का?' असा प्रश्न विचारल्यावर ते म्हणाले, ''मागे बघायचे असते तर देवाने आपल्याला पाठीला डोळे दिले असते'' . ते पुढे म्हणाले की, ''अनेकवेळा माणूस वैफल्यग्रस्त होतो, पण या वैफल्यामुळे आयुष्यात निराशा येऊ नये'', या संदर्भात बोलताना त्यांनी 'जाट रेजिमेंटचे' घोषवाक्य लक्षात ठेवायला सांगितले ते असे, 'Bash on regardless', पुढे काय होणार याचा विचार न करता सरळ जाऊन धडका. कोणत्याही गोष्टीला केवळ विरोधासाठी विरोध करायचा नाही तर त्यामध्ये तथ्य असावं लागतं. आपला आगामी चित्रपट 'झुबेदा' बद्दल सांगताना ते म्हणाले की, ''हा चित्रपट करताना मला असं जाणवलं की स्वतंत्र विचाराच्या एखाद्या स्त्रीला या पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये स्वत:चे विचार मांडून आपले अस्तित्व प्रस्थापित करणे खूप कठीण असते.'' 'वेध'च्या

हृदयात अपार सेवा भरली की, सर्वत्र मित्रच दिसतात.- साने गुरुजी

'स्वार्थ आणि समाधान' या विषयाला अनुसरून ते म्हणाले, ''To be selfish is to gain at the cost of others, total selfishness or total selflessness is not possible. ज्यांना चित्रपट निर्मिती, दिग्दर्शन व इतर तांत्रिक क्षेत्रात करियर करायचे आहे त्यांनी, पुण्याच्या फिल्म इंन्स्टिट्यूट मध्ये किंवा, दिल्लीच्या राष्ट्रीय नाट्यशाळेमध्ये शिक्षण घ्यावं, उगीचच ह्या त्या निर्मात्याकडे जोडे झिजवत वेळ घालवू नये. परंतु या सर्व संस्थांमध्ये प्रवेश घेण्यासाठी प्रथम श्रेणीतील पदवीधर असणे आवश्यक आहे.''

श्री. श्याम बेनेगल यांच्या बरोबर पहिल्या सत्रात होते आंतरराष्ट्रीय कीर्तीचे प्लास्टिक सर्जन डॉ. रवीन थत्ते. आपला वैद्यकीय पेशा सांभाळून, ज्ञानेश्वरीचं इंग्रजीमध्ये भाषांतर करून संपूर्ण जगाच्या कानाकोपऱ्यामध्ये या भारतीय संतांचे तत्त्वज्ञान पोहोचवण्याची ही समाजसेवाचे डॉ. रवीन थत्ते यांनी केलेली आहे. 'हे अनोखे कार्य करण्याचं कसं काय मनामध्ये आले?', असे विचारल्यावर त्यांनी सांगितलं की, ''मला फावल्या वेळात ज्ञानेश्वरी वाचण्याची सवय आणि आवड होती. एकदा असाच मी ज्ञानेश्वरी वाचत असताना, माझी इंग्रजी माध्यमात शिकून इंग्रजाळलेली दोन्ही मुलं मला विचारू लागली, 'Baba, why are you reading such a big fat book and what is it about?' तेव्हा मी विचारात पडलो आणि अक्षरश: या विचाराने झपाटून गेलो की केवळ ज्ञानेश्वरी इंग्रजीमध्ये नाही म्हणून, अखंड मानवजातीला मार्गदर्शन दाखवणारं तत्त्वज्ञान, जीवन जगण्याचं सार ज्यामध्ये आहे त्या ज्ञानाच्या भांडारावाचून माझ्या मुलांनी कायमचं वंचित रहावं? आणि हे जर माझ्या मुलांच्या बाबतीत आहे तर जगातल्या प्रत्येक मुलाच्या बाबतीत हेच आहे आणि हा तत्त्वज्ञानाचा खजिना सर्वांसाठी खुला करून द्यावा म्हणून याचं मी इंग्रजी रूपांतर केलं.'' ही विशाल दूरदृष्टी ठेवून हे अगाध समाजकार्य करणाऱ्या डॉ. रवीन थत्ते यांना आमच्या सारख्यांनी वाकूनच कुर्निसात करायला हवा. कारण हे कार्य करण्यासाठी ज्यांनी पंधरा-अठरा वर्षे फक्त ज्ञानेश्वरी आणि वर्तमानपत्र याशिवाय दुसरं काहीच वाचलं नाही आणि हे अंगिकारलेले व्रत पूर्ण केलं. ते या आधुनिक युगाचे आमच्या मनातले ज्ञानेश्वरच होय.

डॉ. रवीन थत्ते यांचे वडील लष्करात डॉक्टर होते. त्यामुळे सतत बदली होत असल्यामुळे पहिली ते अकरावी त्यांना १५ शाळा बदलाव्या लागल्या. तेही ज्या ठिकाणी जातील तिथे उपलब्ध असलेल्या माध्यमातून. मराठी, इंग्रजी, उर्दू, गुजराथी, हिंदी अशा कोणत्याही. घराण्याच्या परंपरेनुसार वैद्यकीय शिक्षणासाठी प्रवेश मिळाला असला तरी अभ्यासात गोडी असण्यापेक्षा नाच-गाणी, गॅदरींग, पिकनिक यामध्येच जास्त रस वाटायचा. त्यामुळे त्यांच्या आईला त्यांच्या अभ्यासाची खूप काळजी वाटे आणि आईने याबाबतीत कळकळीने लिहिलेले पत्र त्यांना हॉस्टेलमध्ये जेव्हा मिळाले तेव्हा त्यांची आई या जगाचा निरोप घेऊन गेली होती. ही गोष्ट जिव्हारी लागली. मग मन लावून अभ्यास केला. तरीही प्लास्टिक सर्जरीची असलेली परिक्षा नापास झाले. मग ज्या परिक्षेत भारतातील विद्यापीठाने नापास केले तिच परिक्षा त्यांच्या नाकावर टिच्चून लंडनला जाऊन दिली आणि गुणवत्ता यादीत उत्तिर्ण झाले. Chaos म्हणजे गोधळातून Cosmos तयार करतो तो Cosmetic किंवा Plastic Surgeon. याला 'सुघटन शल्यचिकित्सा' हा उत्तम शब्द. डॉ. रवीन थत्तेंनी मुलांना गप्पांच्या ओघात सांगितले की, ''तुम्ही एखादी गोष्ट स्वत:ला आवडते म्हणून करता तेव्हा अतिशय सुखी असता. दुसऱ्या माणसानी आपल्याशी कसं वागावं ही माझी जी अपेक्षा असते, तसे मी जेव्हा वागतो तेव्हा मी चांगला वागतो असे मी म्हणेन.'' त्यांनी मुलांना हेही सांगितलं की, ''तुम्ही जेव्हा प्रथम स्वत:चे सेवक व्हाल तेव्हाच तुम्ही समाजसेवा करू शकाल.'' मुलांनी विचारले, 'तुम्ही जेव्हा घाबरता तेव्हा काय करता?' तेव्हा त्यांनी उत्तर दिले, ''ही फेज जाईल, असे म्हणतो''

---

पृथ्वीवरील घनदाट वृक्षांच्या छायेपेक्षा विवेकरुपी वृक्षांची छाया अधिक शीतल असते. -भगवान बुद्ध

दुसऱ्या सत्रामधले पाहुणे होते सुप्रसिद्ध शास्त्रीय गायक संजीव अभ्यंकर व एव्हरेस्ट शिखर सर करणारा पहिला आशियाई वीर गिर्यारोहक सुरेंद्र चव्हाण. दोघांचेही वय बघता त्यांनी आपापल्या क्षेत्रात केलेली कामगिरी कौतुकास्पद आहे. संजीव अभ्यंकर याने आपल्या गोड आणि सुरेल गाण्याने हजारो रसिकांची मने जिंकली आहेत. आज तो ज्या ठिकाणी आहे तिथवर पोहोचण्यासाठी अनेक कठिण गोष्टींना त्याला सामोरं जावं लागलं. आईकडून गाण्याचा वारसा मिळालेला संजीव दोन वर्षांचा असल्यापासून गायला लागलाय व वयाच्या आठव्या वर्षापासून जाहीर कार्यक्रम करू लागला. तेव्हा त्यांनी गाण्यामध्येच करीयर करावे असे सर्व घरच्यांच्या विचार-विनिमयाने वयाच्या बाराव्या वर्षीच आई-वडीलांचे घर सोडून तो गुरुगृही म्हणजे पंडीत जसराज यांच्याकडे राहिला. म्हणजे अजून बालपण सरलेही नव्हते आणि त्याच सुमारास होणाऱ्या मानसिक आणि शारिरीक स्थित्यंतरामधून जात असतानाच गुरूजींची मर्जी सांभाळत, त्यांना खूश ठेवण्यासाठी, त्या कोवळ्या वयात मनाला किती बांध घालावे लागले, किती मन मारावं लागलं, हे संजीव सगळं सांगत असताना अक्षरश: त्याच्या चेहऱ्यावर उमटत होतं. पण हे सगळं मनामध्ये ठाण मांडून बसलेल्या ध्येयाच्या पूर्ततेसाठी. कितीतरीवेळा गुरूजींबरोबर वेगवेगळ्या शहरांमध्ये अखंड प्रवास करून कंटाळा यायचा. कधी कधी वाटायचं नको हे सगळं पण ते तेवढ्यापुरतच. लगेच मनामध्ये आपल्या उद्दिष्टाची जाणीव व्हायची आणि मन उभारी घ्यायचं. हळूहळू संगीतातले कान तयार होऊ लागले. सूर पक्के होऊ लागले. चांगल्या आवाजाची समज येऊ लागली आणि डोळ्यातल्या कल्पना सत्यात उतरू लागल्या.

संजीवला लक्षात रहाण्यासारखी दाद म्हणजे, एकशे अठ्ठेचाळीस वर्षांची परंपरा असलेले, बाबा हरी वल्लभ संमेलनामध्ये समारोप करायला मिळणे हे शास्त्रीय संगीत क्षेत्रात अत्यंत मानाचं समजलं जातं आणि हा मान १९९२ साली अगदी अचानक व अनपेक्षितपणे मिळाला आणि त्यानंतर सतत तीन वर्षे त्याला या संमेलनाचा समारोप करण्यासाठी आमंत्रित करण्यात आले. हा बहुमान प्राप्त झाल्याबद्दल संजीव स्वत:ला भाग्यवान समजतो. संजीवच्या आयुष्याचं यापुढील ध्येय आहे अगणित लोकांना अमर्याद आनंद देणे.

गिर्यारोहक सुरेंद्र चव्हाण यांनी एकच ध्येय मनाशी पक्क केलं होतं ते म्हणजे एव्हरेस्ट शिखर सर करणे. त्यासाठी दहा वर्षे आधीपासून लहान सहान पर्वतशिखरे चढण्यापासून सुरुवात केली. सह्याद्रीतील अनेक कडे चढून गेला आणि शेवटी एव्हरेस्ट चढून जायचं पक्क केलं. यासाठी एका व्यक्तिने हा निश्चय करून तो पार पाडता येत नाही. त्यासाठी अनेकजण झटत असतात अनेकांची मदत व योगदान असतं. त्याच्यासाठी एकमेकांमधील Co-ordination व team-work अत्यंत महत्त्वाचं असतं. सुरेंद्रला, एव्हरेस्टच्या पायथ्यावरून शिखराकडे पाहिल्यावर काय वाटलं? असे विचारले असता त्याने, "माझं काही झालं तरी चालेल, पण ही आमची मोहिम यशस्वी होवो" असं उत्तर दिले. 'पुन्हा एव्हरेस्टवर जायला आवडेल का?' या प्रश्नाला त्याने "नाही!" असे ठणकावून उत्तर दिले. याचं कारण, यापेक्षाही अवघड आणि सुंदर शिखरे अजून सर करणं बाकी आहे. आपले छोटे छोटे अनुभव मुलांना सांगताना सुरेंद्र म्हणाला की, "आम्ही जेव्हा चढत होतो तेव्हा आम्हाला अनेक वेळा रस्त्यामध्ये यापूर्वी हे शिखर सर करण्यासाठी चाललेल्या अयशस्वी गिर्यारोहकांचे मृतदेह दिसले. ते बघितल्यावर क्षणभर मनात निराशा दाटून येत असे. पण तावडतोब विचार डोक्यात यायचे की या मोहिमेत यशस्वी होऊन एव्हरेस्टवर आपला झेंडा फडकवूनच परतणे, हीच खरी या मृत गिर्यारोहकांना वाहिलेली खरी श्रद्धांजली असेल. आणि म्हणूनच आपण न थांबता पुढे गेलंच पाहिजे. ही जी सकारात्मक वृत्ती असते ती मुलांना प्रेरणादायी असून

---

परोपकार करणारे संतपुरुष फळाची अपेक्षा ठेवत नाहीत. - संत तुलसीदास

यामधूनच अशक्य गोष्ट शक्य करुन दाखविण्याची स्फूर्ती येते.''

या दोन सत्रांबरोबर मुलांना 'शनिवारची डायरी' लिहिण्याचा गृहपाठ देऊन पहिल्या दिवसाचे सत्र संपले.

दुसऱ्या दिवशीचं म्हणजे रविवारचं सत्र सकाळी नऊ वाजता सुरु झालं. सुरुवातीचे पाहुणे होते सुमित्रा भावे व एस. आर. हिरेमठ. सुमित्रा भावे यांनी टाटा इंस्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस मधून पोस्ट ग्रॅज्युएशन केले आहे. त्या चित्रपट निर्मितीमध्ये कार्यरत असून त्यांच्या 'बाई', 'पाणी', 'चाकोरी' या डॉक्यूमेंट्री प्रसिद्ध आहेत. आणि हल्लीच त्यांच्या 'दोघी' या चित्रपटाला राज्य सरकारची अकरा पारितोषिके मिळाली. त्यांना लहानपणी चित्रकार व्हावसं वाटत होतं. वाचनाची फार आवड होती.

दुसऱ्या दिवशीचे म्हणजे रविवारचे सत्र सकाळी नऊ वाजता सुरु झाले. पहिल्या सत्राचे पाहुणे होते सुमित्रा भावे आणि एस. आर. हिरेमठ. सुमित्रा भावे यांनी टाटा इंस्टिट्यूट ऑफ सोशल सायनसेस मधून 'समूह संघटन' (Community organisation) हा विषय घेऊन डिप्लोमा केला. त्यानंतर त्यांनी आदिवासी क्षेत्रात काम केले. ऑल इंडिया रेडिओवर बातम्या द्यायचं काम केलं. काही वर्ष प्राध्यापिका म्हणून पण काम केलं. स्त्रियांच्या संबंधीच्या एका संस्थेमध्ये काम करत असताना जो अभ्यास करायचा होता तो 'स्त्रीची स्वप्रतिमा' हा अभ्यास ज्या स्त्रियांसमोर मांडायचा होता त्या स्त्रिया अशिक्षित असल्यामुळे तो पुस्तकातून मांडता येणार नव्हता तेव्हा दृक्श्राव्य माध्यमाचाच उपयोग करायला हवा हे जाणवले आणि पहिली 'बाई' ही फिल्म तयार केली. ही फिल्म जेव्हा केली तेव्हा सुमित्रा भावे यांना चित्रपट कसा तयार करतात वगैरे काहीही माहिती नव्हती. मग पुस्तकं वाचून, त्या क्षेत्रातल्या लोकांना भेटून आणि सगळ्यात विशेष म्हणजे मुलींच्या कॉलेजमधील लहान मित्रमंडळींच्या मदतीने चित्रपट कसा तयार होतो ते शिकल्या. खेड्यापाड्यात जर जागृती निर्माण करायची असेल आणि त्यांच्या सहकार्याने जर समस्या मिटवायच्या असतील तर दृक्श्राव्य माध्यम हे खूप प्रभावी आहे. अशा प्रकारे समाज जागृती करणे या सामाजिक जाणिवेतूनच समित्रा भावे या चित्रपट क्षेत्राकडे वळल्या. त्यानंतर त्यांनी 'पाणी', 'चाकोरी' या डॉक्यूमेंट्री फिल्म केल्या त्याला राज्य शासनाची व इतर असंख्य पारितोषिके मिळाली. त्यांच्या 'दोघी' या फिचर फिल्मला राज्य सरकारची अकरा पारितोषिके मिळाली. त्यांनी त्यांचा आगामी चित्रपट '१० वीफ' हा कुमारवयीन मुलांच्या समस्येवरील चित्रपटाच्या गमतीदार गोष्टी सांगितल्यामुळे सर्व मुलांना खूप मजा आली. '१० वी फ' या शिक्षकांकडून उपेक्षित असलेल्या गरीब कष्टकरी विद्यार्थ्यांच्या वर्गाच्या तुकडीच्या व्यथा या चित्रपटामध्ये मांडल्या आहेत.

श्री. एस. आर. हिरेमठ यांनी बी. ई. मेकॅनिकलची पदवी घेतल्यानंतर कॅनसास विद्यापीठ - कॅनसास अमेरिका इथून ऑपरेशन रिसर्च मध्ये एम. एस. केले आणि दहा वर्षे ते शिकागोमध्ये मॅनेजमेंट कंसलटंट म्हणून काम केले. हिरेमठ हे अत्यंत गरीब परिस्थितीतून वर आले. परंतु त्यांना शाळेमध्ये उत्तम शिक्षक मिळाल्यामुळे ते अभ्यासात खूप पुढे गेले. एस. एस. सी. बोर्डात दुसरा क्रमांक पटकावून नॅशनल मेरीट स्कॉलरशिप व इतर अनेक पारितोषिके सतत मिळविली. 'समाजाकडून आपल्याला जे मिळतं ते समाजाला परत करायचं असतं. हा मानवधर्म आहे.' याच विचाराने ते दहा वर्ष अमेरिकेमध्ये राहून भारतात परत आले. भारतात परतल्यानंतर त्यांनी त्यांच्या धारवाड येथील छोट्या गावात 'ग्रामीण अभिरुद्धी' कार्यक्रम सुरु केला. त्यांनी असं पाहिलं की गावातली जी तुंगभद्रा नदी होती त्या नदीच्या काठची गावं प्रगती करीत नव्हते. याचं कारण बिर्ला ग्रुप ऑफ इंडस्ट्रीज्च्या हरिहर पॉलीफायबर प्लांटनी सोडलेल्या रसायनांमुळे नदीचे पाणी प्रदुषित होत असे व त्याचा परिणाम आरोग्यावर होई. म्हणून मग गावातील लोकांना एकत्र करून

संत आणि न्याय याहून कोणताच धर्म मोठा नसतो. -म. गांधी

संघटना स्थापून त्यांनी बिर्ला ग्रुपच्या विरुद्ध आंदोलन सुरु केलं. त्यांच्या मताप्रमाणे 'सामान्य व्यक्तिमध्ये एक असमान्य शक्ती असते' आणि म्हणून सामान्याच्यात असलेली ताकद पणाला लावून ते या लढ्यामध्ये उतरले. त्यांनी त्यांच्या या चळवळीमध्ये आलेले अनेक अनुभव मुलांना सांगितले. शेवटी ते म्हणाले, ''जर तुम्हाला एका ऋतुचं आयोजन करायचं असेल तर तुम्ही एक पीक काढा. जर तुम्हाला १० ते १५ वर्षांचं आयोजन करायचं असेल तर तुम्ही एक झाड लावा आणि जर तुम्हाला ५० ते १०० वर्षांचे आयोजन करायचं असेल तर जाणीव -जागृती असलेला माणूस तयार करा.''

दुसऱ्या सत्रामध्ये आलेल्या पाहुण्यांमध्ये होते Essel group चे तरुण उद्योजक श्री. अशोक गोयल. ज्यांनी बालजगतालाच भूरळ घातली नाही तर सर्वच वयोगटातील लोकांना आकर्षित केले. अशा 'एस्सेल वर्ल्ड' व 'वॉटर किंगडम' ची निर्मिती का करावीशी वाटली, असे श्री. अशोक यांना विचारण्यात आले तेव्हा त्यांनी त्यांचे अनुभव व आठवणी सांगितल्या त्या अशा की, लहानपणापासून कुटुंबाचा व्यवसाय हा व्यापार करणे हाच होता आणि अभ्यासाला एवढं महत्त्व नव्हतं. त्यापेक्षा घराण्याच्या व्यवसायात जास्त लक्ष घाल असा घरच्यांचा होरा होता. म्हणून शाळा शिकत असताना शाळेतून आल्यानंतर दुकानात जाणे व सर्व हरकाम्याची कामे करणे वाट्याला यायची. असं करता करता बी. कॉम. पर्यंतचं शिक्षण पूर्ण झालं. मग वडिलांनी त्यांच्या आजारी कारखान्यांना चालना देण्याचं काम अशोक यांच्याकडे सोपवलं. अशा प्रकारे शून्यातून काही निर्मिती करायची ही एक जिद्द मनानी घेतली आणि 'एस्सेल वर्ल्ड' जिथे आहे ती जमीन पाहिल्यानंतर 'डिस्नेलँड' सारखं भारतातही काही करायचं असा निश्चय केला. अशोक गोयल यांनी पण अर्थातच सगळ्या यशाचं श्रेय टिमवर्कला दिलं आणि सांगितलं की, तुम्ही तुमच्या सहकाऱ्यांना व हाताखाली काम करणाऱ्यांना शिस्त लावणं, कामावर प्रेम करणं व करायला शिकवणं आणि त्यांचा विश्वास संपादन करणं हे फार महत्त्वाचं असतं. हे असेल तरच अशा प्रकारचे मोठे प्रकल्प पार पडू शकतात. त्यांनी हेही सांगितलं की, एस्सेल वर्ल्डची रचना करताना नुसताच मनोरंजनात्मक दृष्टिकोन समोर न ठेवता यामुळे पर्यावरणाच्या बाबतीत कोणत्याही प्रकारे दोष आढळणार नाही याची खबरदारी घेतली आहे. 'वॉटर किंगडम' चे पाणी वाया न जाता ते सतत रिसायकल करून निर्जंतूक केले जाते तर एस्सेल वर्ल्डमधील कचरा व सांडपाणी हे खत निर्मिती करण्याकरता पाठवले जाते. हे सर्व सीपेज पाईप व डंप यार्ईसच्या सहाय्याने केले जाते. मुलांना त्यांनी 'साबु' सतत वापरण्यास सांगितले. 'साबु' म्हणजे 'सामान्य बुद्धी' आणि आपले पालक हे नेहमी आपल्या भल्यासाठी सांगत असतात तेव्हा विशेषत: ह्या वयोगटातील मुलांची पालकांचे न ऐकण्याची किंवा त्यांच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करण्याची वृत्ती निर्माण होते ती होऊ देऊ नका कारण पालक जे सांगतात त्याचा पुढे फायदा होतो. या त्यांच्या वक्तव्यावर पालकवर्गाकडून टाळ्या आल्या.



ब्रिगेडियर शरद कोठारेंना सैनिकी प्रशिक्षण गटातील छात्र व्यासपीठाकडे एस्कॉर्ट करताना.

त्यानंतर ब्रिगेडियर कोठारे यांच्याशी गप्पा झाल्या. ब्रिगेडियर कोठारे हे B.Sc. Hon असून १९६२ मध्ये ते

भारतीय लष्करामध्ये भरती झाले. व चीन व पाकिस्तान ही दोन युद्ध ते लढले होते. '७ मराठा बटालियन' चे ते प्रमुख होते. आणि तोफखान्याचा पुरवठा करण्याचे काम त्यांच्याकडे होते. युद्धाचे अनुभव सांगताना त्यांनी सांगितले की, कित्येक वेळा तुम्हाला सलग ३-४ दिवस झोप मिळत नाही. वेळच्या वेळी खाणं-पिणं मिळत नाही. किंवा जे मिळतं ते तुम्हाला तुमच्या सहकाऱ्यांबरोबर वाटून घ्यावं लागतं. कित्येक वेळा कुटुंबामध्ये किंवा तुमच्या व्यक्तिगत जीवनामध्ये एखादा अत्यंत महत्त्वाचा क्षण किंवा दिवस असतो परंतु ड्यूटीवर रूजू होण्याची ऑर्डर मिळाली की तुम्हाला सर्व तसंच सोडून जावं लागतं. पण आपल्या देशासाठी आपण हे करतोय याची जाणीव जेव्हा होते तेव्हा या सर्व गोष्टी अत्यंत छोट्या वाटायला लागतात. मुलांनी जेव्हा त्यांना विचारलं की, लष्करात असल्यामुळे तुमच्या कौटुंबिक आयुष्यावर काय परिणाम झाला होता? कौटुंबिक आयुष्यही अत्यंत शिस्तबद्ध होतं का? तेव्हा त्यांनी सांगितलं की, ते आपोआपच शिस्तीचं वळण लागतं. पण मी एवढा कडक नव्हतो. दुसर म्हणजे देशप्रेम आपोआप जागृत होतं. ब्रिगेडियर कोठारेंना अभिमानास्पद वाटण्यासारखे म्हणजे त्यांच्या तिन्ही मुली सैन्यात आहेत आणि एक जावई पण सैन्यातच डॉक्टर आहे. दोन जावई पंजाबी आणि बंगाली आहेत. त्यामुळे त्यांच्या घरातच राष्ट्रीय एकात्मता आहे. त्यांनी सर्व मुलांना संदेश दिला की, खूप अभ्यास करून एन. डी. ए.मध्ये प्रवेश घेऊन सैन्यात जा. मुली आहोत म्हणून मागे राहू नका आणि या देशातील प्रत्येक कुटुंबातील एकातरी मुलाने देशासाठी सैन्यात जावे.

यानंतरच्या सत्रात होते ते आय. ए. एस. अधिकारी असलेल्या मेधा गाडगीळ आणि आय. पी. एस. ची परीक्षा मातृभाषेमध्ये लिहिणारे इन्स्पेक्टर उद्धव कांबळे. मेधा गाडगीळ यांना उच्च शिक्षणाची कौटुंबिक पार्श्वभूमीच होती. त्यामुळे आपण आय. ए. एस. व्हायचे हे आधीच ठरविले होते. वडील दिल्लीला ऑल इंडिया रेडिओ आणि नंतर दूरदर्शनवर अधिकारी होते. त्यामुळे सर्व परिक्षा, शासकीय कामकाज, सरकारी धोरणं यांची चर्चा घरामध्ये होतच असे. त्यातूनच या विषयाची आवड निर्माण झाली. पुढे आय. ए. एस. अधिकारी झाल्यानंतर एक स्त्री अधिकारी म्हणून त्यांना काय काय अनुभव आले हे सांगताना त्यांनी एक अनुभव सांगितला की, एका ठिकाणी कलेक्टरसंच्या मिटींगसाठी गेल्या असताना त्या ठिकाणी पोहोचल्यावर 'मिटींग कुठे आहे?' हे विचारले असता तिथल्या अधिकाऱ्यांनी 'आता कलेक्टर्सची मिटींग चालू आहे, कोणी भेटणार नाही' असे उर्मट उत्तर दिले. तेव्हा, 'अहो मी पण कलेक्टर आहे आणि त्याच मिटींगसाठी आले आहे' असे सांगितल्यावर तो अधिकारी म्हणाला, 'असं होय, मला वाटले सर्व कलेक्टर्स पुरुषच आहेत'.

आपला दोन मुलांचा संसार समर्थपणे सांभाळून मुलांच्या सर्व गरजा पुऱ्या करून एवढ्या जबाबदारीची व महत्त्वाची पदं समर्थपणे पेलणाऱ्या मेधा गाडगीळ यांनी सर्व मुलांना या क्षेत्रामध्ये जास्तीत जास्त आघाडीवर पोहोचण्याचे आव्हान दिले.

इन्स्पेक्टर उद्धव कांबळे यांचं वैशिष्ट्य असं की मातृभाषेमध्ये म्हणजे मराठीमध्ये आय. पी. एस. ची परिक्षा देणारे ते पहिलेच परिक्षार्थी आहेत. सुरुवातीला सहा वर्षे शिक्षक म्हणून काम केले. आय. पी. एस. ची परिक्षा मी मराठीतूनच देईन असा हट्ट धरून यू. पी. एस. सी. ला तसा अर्ज करून अनेक प्रयत्नांनी हा हट्ट तडीस नेला. कोणत्याही क्षेत्रात पुढे जाण्यासाठी सामान्य ज्ञान चांगलं असणं हे फार जरुरीचं आहे असं त्यांनी मुलांना सांगितलं. सध्या ते डेप्यूटी कमिशनर ऑफ पोलीस, मध्य रेल्वे, या पदावर असून जे.एफ. रिबेरो - माजी पोलीस कमिशनर यांना ते आदर्श मानतात. श्री. कांबळे यांनी या क्षेत्रात काम करताना त्यांना आलेले अनुभव अनेक छोट्या मोठ्या प्रसंगातून मुलांसमोर मांडले.

शेवटच्या सत्रामध्ये आलेले पाहुणे बहुतकरून सर्व मुलांचे लाडके व अत्यंत सुपरिचित असे 'माचिस' चित्रपटामधून गाजलेले अभिनेता चंद्रचूडसिंग आणि जिला दात दाखवून स्मित करणंच अत्यंत शोभून दिसतं अशी सर्वांची लाडकी रेणूका शहाणे या दोघांच्या उपस्थितीत 'वेध' परिषदेचा समारोप झाला. चंद्रचूडसिंग हा उत्तर भारतामधील आणि डेहराडूनच्या प्रसिद्ध 'डूनस्कूल' मध्ये शिक्षण घेऊन इतिहास हा विषय घेऊन बी.ए. झाला. सुरुवातीला शाळेमध्ये इतिहासाचा शिक्षक म्हणून नोकरी केली. नाटक, अभिनय याच्या आवडीतून चित्रपटात पदार्पण झालं. यासाठी त्यानं ठरविलं वगैरे काही नव्हतं. केवळ योगायोगाने चित्रपटात काम मिळाली. पण शिक्षकी पेशा अतिशय आवडतो. तेव्हा चित्रपटांमध्ये बस्तान बसले नाही तर पुन्हा हिस्ट्री टिचर व्हायला आवडेल, असं त्यांनी सांगितले. रेणूका शहाणेनी क्लिनिकल सायकॉलॉजी घेऊन एम.ए. केलं. दादरच्या किंग जॉर्ज शाळेमध्ये शिक्षण घेत असताना नॉर्मल इतर शालेय विद्यार्थ्यांसारखी टगेगिरी करून दादरमध्ये वाढलेली. चित्रपट क्षेत्रात येण्याचं ठरवलं नव्हतं. एम.ए. झाल्यानंतर पी.एच.डी. करायची होती पण एक वर्ष गॅप घेऊन बघू असं ठरवलं आणि टी.व्ही. वरती चांस मिळाला आणि तेच पुढे चालू राहिलं. आपण करत असलेल्या कामावरच लक्ष केंद्रीत करून मनापासून काम केलं तर आपण नक्कीच यशस्वी होऊ असं सांगणाऱ्या रेणूकाला मुलांनी विचारले 'सेटवर माधुरी दिक्षित आणि तुम्ही कोणत्या भाषेत बोलता? तेव्हा तिने उत्तर दिले, ''अस्सल मराठमोळ्या भाषेत!'' रेणूकाला उकडीचे मोदक फार आवडतात. आणि सुंदर मोदक करताही येतात.

यावेळी परिषेदेने एकूण पंधरा बक्षिसे ठेवली होती. त्यामधील दहा बक्षिसे विचारलेल्या चांगल्या संयुक्तिकप्रश्नांना होती आणि पाच बक्षिसे 'शनिवारच्या डायरीला'. सर्व मुलांनी सर्व वक्त्यांना अतिशय चांगले



''दिसण्यात काही नसतं, मग लोकचेहऱ्यांना प्लास्टिक सर्जरी का करून घेतात ?'' डॉ. रवीन भत्ते यांना विचारलेल्या उत्तम प्रश्नां पैकी एक. या प्रश्नासाठी पारितोषिक मिळवणारा, टिळकनगर विद्या मंदिर, डोंबिवलीचा विद्यार्थी.

आणि विचार करण्यासारखे प्रश्न विचारले होते. त्यातील सर्वच प्रश्न विचारणे शक्य नव्हते. जे महत्त्वाचे वाटले ते प्रश्न विचारण्यात आले. उत्स्फूर्तपणे तिथल्या तिथे कविता करणारे छोटे कविही या ठिकाणी होते. त्यातील कविता वाचून दाखवून व या मुलांचा छोटीशी भेट देऊन केलेल्या गौरवामुळे मुलांना 'वेध' बद्दल जास्त आपुलकी आणि प्रेम वाटतं. सगळ्याच गोष्टीत उपस्थित सर्व मुलांचा व मोठ्यांचा सहभाग असतो त्यामुळे सर्वत्र आनंदी आणि उत्साही वातावरण असतं. सर्व मान्यवर पाहुण्यांच्या सह्यां असलेला 'हस्ताचा पाऊस' छापील स्वरूपात सर्वांना देण्यात येतो. 'परिषदेचा समारोप झाल्यानंतर परतताना पुढल्या वर्षीच्या 'वेध'पर्यंत उरलेल्या तीनशे पासष्ट दिवसांसाठी एक प्रकारचं सळसळतं चैतन्य आणि उत्साह ओसंडून वाहत असतं!

**विशाखा देशपांडे**
१५, जीवनसरिता, स्टेट बँकेजवळ,
आईस फॅक्टरी, नौपाडा, ठाणे.

***

# यशाचा कानमंत्र

*या महिन्यात १६ फेब्रुवारी रोजी दासनवमी आहे. त्या निमित्ताने दासबोधाचे स्मरण वेगळ्या दृष्टीने या लेखात मांडले आहे. अशा प्रेरणादायी ग्रंथांचे वाचन लहान/तरुण वयात करावयाचे असते.* - संपादक

मानवी जीवन सुंदरतेनेच खुलून दिसते. सुंदर जीवनच यशस्वी होते. म्हणूनच प्रत्येकजण व्यक्तिगत आदर्श व सामाजिक आदर्श यांची सांगड घालून व्यक्तिमत्त्वाची जडणघडण करत असतात. जीवनात सौंदर्य निर्माण करण्यासाठी त्याला सुंदर, घोटीव आकार घाटदारपणे देतात. आपल्याला जो आकार जीवनास हवा आहे त्यासाठी शिस्त आवश्यक आहे. सर्व प्रकारच्या नियमांचे पालन केल्याशिवाय शिस्त लागत नाही. आळस टाकल्याशिवाय शिस्त व नियम पाळता येत नाही. शिस्तीनेच जीवनास मनोहर घाट प्राप्त होतो. श्रीसमर्थांनी याच दृष्टीने **'ग्रंथराज दासबोधा'**त स्वयंशिस्तीचे महत्त्व स्वानुभवातून 'आदर्श दिनचर्ये' द्वारे स्पष्ट केले आहे. संतत्व वृत्तीतून श्रीसमर्थ **'आधी केले मग सांगितले'** असे अनुभवसिद्ध असल्याने कुमारांनाही ते विश्वासार्हच आहेत.




ज्याप्रमाणे एखादे अस्ताव्यस्त घर कोणालाच आवडत नाही तसेच ढगळ, अघळपघळ, बेडौल व्यक्तिमत्त्वही खुलत नाही. जीवनात अनुशासनाला फार महत्त्व आहे. जीवनाचे सुंदर वळण कळण्यासाठी आळस सोडून नियम पाळावे. नियम पाळून शिस्त शिकावी आणि शिस्तीने वागून प्रत्येक गोष्टीचे श्रेय ज्याचे त्याला अर्पण करावे. अशा गुणसंपन्नतेतूनच जीवनास राजसता लाभते.

आपल्या आयुष्याचा कोणताही क्षण वाया जाऊ न देणे हेच भाग्याचे लक्षण! श्रेष्ठ तत्त्वज्ञ विनोबाजी, अहिंसावादी गांधीजी ह्यांनी 'रिकामा जाऊ नेदी एकही क्षण' या समर्थोक्तीचा नियम तंतोतंत पाळला म्हणूनच ते अनुक्रमे 'आचार्य', 'महात्मा' ठरले. ह्या लोकोत्तर गौरवातूनच मान, सन्मान, कीर्ती, लौकिक, प्रसिद्धी सारे आपोआप मिळाले. सामान्यांनाही ह्या गुणांचा मोह आहेच ना! मोठ्यांचे बाह्यदर्शन, बाह्यानुकरण न करता कृतीचरण महत्त्वाचे ठरते. जीवनात नीती न्यायाने वागून क्षणाक्षणाचा सदुपयोग करावा हेच आपले ध्येय ठरते.

प्रात:काळी दिवसाला केलेला प्रारंभ भरपूर तासांचा वाटतो. आत्मचिंतनातून गुणैश्वर्य प्राप्ती होते. बोलण्यातील सततचे मार्दव, मधुरभाषित्व जगालाही जिंकते. स्वत:हून, सत्य, रसाळ बोलण्यातून स्नेहाची स्निग्धता वाढत जाते.

दुसऱ्यांच्या दोषांची चर्चा टाळावी. 'राखावे अंतर सर्वांचे' सुखदु:खाच्या संमिश्र प्रसंगातच खरी कसोटी लागते. त्याचवेळी 'मानवधना'चा कणा गवसतो. 'कृतज्ञता' हा तारुण्यातला 'शृंगार' व यौवनातील 'दागिना' आहे. जगातील सर्वच थोर पुरुषांच्या अंगी 'कृतज्ञता' हा अनमोल गुण सार्वकालिक व श्रेष्ठ आहे. संतांच्या वाणीतून तर

कृतज्ञता तुडुंब भरून वाहते. याचा अनुभव इयत्ता पहिली ते बारावीपर्यंतच्या मराठीच्या पाठ्यपुस्तकात आपल्याला येऊन गेलाच आहे.

मनुष्यच साक्षात सदेव आहे ह्याचे पहिले लक्षण म्हणजे 'रिकामा जाऊ नेगे एक क्षण' आहे. ज्ञानातील परिपक्वता, अनुभवातून ज्ञान मिळवून अडचणीत सापडलेल्या लोकांना सोडवावे, शरीर कारणी लावावे, स्वतः श्रम करावेत. ह्या सर्व व्यवहारात विवेक फारच उपयुक्त आहे.

अशा सद्गुणांचे आचरण करून जीवन यशस्वी करण्यासाठी आदर्श दिनचर्या कठोर व्रतासारखी आचरणात आणणे महत्त्वाचे आहे. स्वामी विवेकानंद, संत ज्ञानदेव, श्रीसमर्थ रामदास अशा महापुरुषांच्या चरित्रातून त्यांच्या ग्रंथभांडारातून हे आदर्श वेचले पाहिजेत आणि विद्यार्जनाच्या या दीर्घ कालावधीत त्यांचे शब्द मंत्ररूपाने गुंजत ठेवणे गरजेचे आहे. खरं तर बालपणातील आणि कुमारावस्थेतील प्रत्येक प्रयत्न फलदायीच ठरतो. म्हणून आपले जीवन कृतीशीलच करावे. अशा आचरणातून सुख, शांती, समाधान लाभते यशस्वी जीवनाची हीच खरी गुरूकिल्ली आहे.

**सौ. उषा जयंत कळमकर**
डॉ. बेडेकर विद्या मंदिर,
नौपाडा, ठाणे.

***

## नियती

लक्ष्मी गर्भश्रीमंत होती,
अन् तिचा पती व्यापारी होता;
सरस्वती निष्कांचन होती,
अन् तिचा पती विद्वान होता ...
एकदा आपापल्या नवऱ्यांना कंटाळून
त्यांनी नवऱ्यांची अदलाबदल केली;
अन् व्यापारी
निष्कांचन सरस्वतीचा निष्कांचन पती बनला
अन् विद्वान
गर्भश्रीमंत लक्ष्मीचा गर्भश्रीमंत पती बनला ...
व्यापाऱ्याला युक्ती सुचली :
त्यानं सरस्वतीचा देहविक्रय केला
अन् कालांतराने तो पुन्हा गर्भश्रीमंत झाला;
विद्वानाला विरक्ती सुचली :
त्याने लक्ष्मीचे देहदान केलं
अन् कालांतराने तो पुन्हा निष्कांचन झाला ...
लक्ष्मी - सरस्वतीला कळून चुकलं
की नियती कधी चुकत नाही !

**प्रा. विनोद कांबळी**
वि.प्र. मंडळाची
इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, ठाणे.

***

# ठाणे महानगरातील वाहतुकजन्य प्रदूषण : व्याप्ती आणि उपाययोजना

डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी स्मृती, मुंबई पुरस्कृत 'वास्तवदर्शन पाठ्यवृत्ती-१९९९' या अंतर्गत तयार केलेला अभ्यास अहवाल 'ठाणे महानगरातील वाहतुकजन्य प्रदूषण: व्याप्ती आणि उपाययोजना' हा पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाला. या पुस्तकाचे लेखक आहेत प्रा. विद्याधर वालावलकर.




प्रा. वालावलकर यांच्या पुस्तकाच्या प्रकाशन समारंभाचा फोटो.

प्रा. वालावलकर यांनी मुंबई विद्यापीठातून रसायनशास्त्र विषयातील पदव्युत्तर शिक्षण घेतले आहे. तसेच एस.एन.डी.टी. विद्यापीठाचा वृत्तपत्रविद्या पदविका अभ्यासक्रम विशेष प्रावीण्यासह ते उत्तीर्ण झाले आहेत. १९८० सालापासून विविध वृत्तपत्रातून शिक्षण, व्यवसाय मार्गदर्शन, वाहतूक समस्या, पर्यावरण, विज्ञान, सांस्कृतिक व साहित्यिक विषयांवर सातत्याने त्यांचे लेखन चालू असते. अ.भा. विद्यार्थी परिषदेच्या 'विद्यार्थी' या प्रकाशनाचे चार वर्षे संपादन त्यांनी केले आहे. 'कॉलेज कॅम्पस' या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या मासिकाचे प्रकाशन व संपादनही त्यांनी केले आहे. विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनात ते प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत.

ह्या पुस्तकाला रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी - डॉ.श्यामा प्रसाद मुखर्जी स्मृती, मुंबई पुरस्कृत पाठ्यवृत्ती मिळाल्याने पुस्तक कसे आहे याची उत्सुकता वाटल्याने हे पुस्तक वाचण्यात आले. त्यांच्या या पुस्तकाला मार्गदर्शक डॉ. नंदकुमार जोशी लाभले आहेत.

वाचन, अभ्यास, चर्चा व माहिती संकलनातून वाहनांमुळे होणाऱ्या प्रदूषणाची व्याख्या व प्रतिमा स्पष्ट व्हायला लागली व त्यातून ह्या पुस्तकाची प्रतिमा स्पष्ट व्हायला लागली.



१९९२ साली ठाण्यामध्ये रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी तर्फे, 'ठाणे महानगर वाहतूक समस्या परिषदे'चे आयोजन झाले होते तेव्हा त्या निमित्ताने या लेखकाने या समस्येचा पूर्ण अभ्यास केला होता. त्या परिषदेमध्ये वाहतूक तज्ज्ञ श्री. पसरीचा, ठाण्याचे तत्कालिन खासदार श्री. कापसे, श्री सतीशचंद्र प्रधान, तसेच वाहतूक तज्ज्ञ

डॉ. पाटकर उपस्थित होते. तसेच ठाण्यातील रिक्षा, एस.टी., आर.टी.ओ.चे प्रतिनिधी, महानगरपालिकेचे तत्कालिन आयुक्त श्री. मधुकर चौबे उपस्थित होते व त्यांनी या चर्चेत प्रत्यक्ष भागही घेतला होता. ठाणेकर नागरिकांनी शेकडो सूचना पत्राने, निबंध स्वरूपात पाठविल्या होत्या. या सर्वांचा हे पुस्तक लिहिताना लेखकाला उपयोग झाला होता. नंतर टी. चंद्रशेखर यांच्या रस्ता रुंदीकरणानंतर या समस्येचे स्वरूप अधिक भेडसावू लागले व लेखकाने याबाबत अधिक अवलोकन व अभ्यास करून या पुस्तकासाठी साधनसामग्री जमविली.

या पुस्तकाची एकूण चार विभागात मांडणी केली आहे :- १) **प्रदूषण** - वाहनांमुळे होणारे प्रदूषण. २) महानगरातील वाहतुकीच्या प्रदूषणासंबंधात आजवर झालेल्या अभ्यासातील निष्कर्ष - **प्रदूषणाचे दुष्परिणाम**. ३) वाहनांमध्ये वापरले जाणारे **इंधन** हे मुख्यत: प्रदूषणाला जबाबदार असते. ग्रीन पेट्रोल पर्यायी इंधन अशी माहिती ही आहे. ४) **उपाययोजना** - वाहतूक व्यवस्था सुरळित करण्याशी हा प्रश्न जोडला गेल्याने मुख्यत: वाहतूक व संबंधित घटकांसाठी सूचना यात आहेत. सरकारी योजनांचा, कायदा व तत्सम उपाययोजनेचाही विचार यात केला आहे.

या प्रकल्पलेखनाचे वाचन सुलभ होण्यासाठी काही माहिती त्यात दिली आहे. त्यात त्यांनी स्वच्छ व कोरड्या वायूंचे हवेतील प्रमाण यांवर एक तक्ताच करून दिला आहे. याशिवाय प्रदूषके व त्यांचे उगमस्थान हेही त्यांनी तक्त्याच्या रूपात दिले आहे. या सर्व प्रदूषणाचे मानवावर होणारे परिणाम भयावह दिसून येतात.

वाहतुकीमुळे होणाऱ्या प्रदूषणाची चार कारणे या पुस्तकात दिलेली दिसतात. १) कालबाह्य वाहन तंत्रज्ञान, २) इंधनाची गुणवत्ता, ३) शहरांमधील वाहतूक व्यवस्थेचे अपुरे नियोजन, ४) वाहनांच्या देखभालीकडे केलेले दुर्लक्ष यामुळे प्रदूषणात अधिकच भर टाकली जाते.

यात एका प्रकरणात ठाणे महानगरामध्ये वाहनांपासून होणारे प्रदूषण याचा आढावा घेतलेला आहे. यांत चौक, रस्ते यांत असलेले प्रदूषण यांची तक्त्याप्रमाणे माहिती दिलेली आहे.

नुसते प्रदूषण व समस्या एवढीच माहिती लेखकांने या पुस्तकात दिली नाही तर त्यावर उपाययोजनाही सुचविली आहे. ठाणे शहर औद्योगिक शहर आहे. यात बाहेरचे लोकही नोकरी निमित्त येतात. या सर्वांचा विचार करून उपाययोजना सुचविल्या आहेत. याही दोन विभागात विभागून यांची मांडणी केली आहे. एका विभागात वाहतुकीशी संबंधित सर्व घटकांसाठी काही विशिष्ट सूचना व मार्गदर्शक तत्त्वे दिलेली आहेत. दुसऱ्या विभागात ठाण्याच्या वाहतूक व्यवस्थेसंबंधी काही उपयोगी बदल व अभिनव कल्पना सुचविल्या आहेत. ठाणेकरांच्या स्वप्नातील काही भव्य योजनांचाही या पुस्तकात उल्लेख केलेला आहे. यात ठाणे शहराच्या रेल्वे स्टेशनच्या इमारतीचे व पर्यायाने परिसराचे आधुनिकीकरण. अत्यंत आधुनिक अशा लाईट रेल्वेच्या रिंगरूट मार्फत परिवहनाची सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न. ठाण्याच्या जवळ मनोरूग्णालयाच्या जवळ धाकटे ठाणे स्टेशनची कल्पना. कळवा टर्मिनस बनविण्याची योजना, ट्रक टर्मिनसद्वारे शहरातील मालवाहतुकीचा विचार, ठाणे पूर्व-पश्चिम जोडणारा उड्डाणपूल, ठाण्याच्या बाजूने वाहणाऱ्या खाडीचा सुलभ जलवाहतुकीचा विचार या सर्व योजनांचा उद्देश सुरळित वाहतूक व्यवस्थेच्या दृष्टीने टाकले जाणारे पाऊल आहे. या सर्व उपाययोजनांनी ठाण्याचा कायापालट नक्कीच होऊ शकेल. हे अशक्य नाही. फार तर त्यासाठी थोडा वेळ जावा लागेल असा आशावाद लेखकाकडे आहे. यात काही सूचना प्रत्यक्षातही आलेल्या दिसतात. विशेष म्हणजे हे

(पान क्रमांक २० वर)

# स्वा. सावरकर साहित्य दर्शन

*स्वातंत्र्यवीर सावरकरांचे साहित्य वाचणे हा थरारून टाकणारा अनुभव असतो. आजच्या तरुणपिढीला या साहित्याची दुर्दैवाने कल्पना नसते. त्या दृष्टीने या साहित्याचा परिचय करुन देणारा हा लेख. या महिन्यात स्वातंत्र्यवीरांची पुण्यतिथी आहे. त्या निमित्ताने 'दिशा' तर्फे ही शब्दांकित श्रद्धांजली !* - संपादक

२१ व्या शतकातील भारतीय इतिहासकार, २० व्या शतकातील पहिल्या सात दशकांचे राजकीय दृष्ट्या जेव्हा सिंहावलोकन करील तेव्हा त्याला न्या. रानडे, दादाभाई नौरोजी, लो. टिळक असे अनेक नेते विशिष्ट दशकांवर आपला ठसा उमटवताना दिसतील. पण या सात दशकांमध्ये या ना त्या कारणाने आणखी एका व्यक्तीचे नाव पुढे येते. ती व्यक्ती म्हणजे स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर. कारण या सात दशकांवर सावरकरांनी स्वकर्तृत्वाने स्वतःचे नाव कोरून ठेवले आहे. सावरकर जहाल देशभक्त होते, प्रथम श्रेणीचे क्रांतिकारक होते, महाकवी होते, इतिहासकार, नव्या समाजाचे स्मृतिकार होते, देशाच्या स्वातंत्र्यासाठी देहदंड सोसताना जनकासारखे स्थितप्रज्ञ होते, प्रकांड पंडित होते, लेनिन, स्टॅलिन यांच्यासारखी दृष्टी व ताकद असलेले नेते होते. फक्त या नेत्यांसारखे ते शासनाधिष्ठित नव्हते. तरी जनसामान्यांवर त्यांनी आपल्या वाणीने व लेखणीने चांगलाच ठसा उमटवला होता.

त्यांची वाणी नि लेखणी खड्गासारखी धारदार व लखलखीत होती. त्यांनी जे ज्वलंत साहित्य उभ्या राष्ट्राला दिले ते आकाराने जेवढे भव्योदात्त तेवढेच गुणवत्तेतही कान्तिमान व स्फूर्तिदायी, चिरंजीवी ठरले. त्यांचे वाङ्मय विविध स्वरुपाचे व विपुल असून ते सर्वच उद्बोधक, मार्गदर्शक आणि स्फूरणदायी आहे. तसेच ते मराठी व इंग्रजी अशा दोन्ही भाषात आहे.

सावरकरांचे वडील दामोदरपंत सच्छिल व धार्मिक वृत्तीचे. रामायण, महाभारत यातील उतारेच्या उतारे ते तोंडपाठ म्हणत. आपल्या मुलांनाही ते बखरी व पोवाडे वाचून दाखवत. त्यामुळे पोवाडे, बखरी, लोककथा, वीरकथा, इतिहासकथा इ. चे संस्कार बाल विनायकावर झाले. त्यांची स्मरणशक्ती अतिशय तल्लख. सगळी संध्या त्यांनी ५/६ दिवसात पाठ केली. अवांतर विषयाचा अभ्यासही विपुल केला. इतिहास व महाकाव्ये यातून त्यांना स्फूर्ती मिळाली. पुस्तके, वृत्तपत्रे वाचण्याचे त्यांना विलक्षण वेड होते.

ज्ञानाचा दुर्दम्य हव्यास, तल्लख स्मरणशक्ती आणि मधुर बोलणे या गुणांमुळे प्रत्येकाच्या मनावर त्यांची चांगलीच छाप पडत असे. वयाच्या १६व्या वर्षी मातृभूमीला स्वतंत्र करण्याची शपथ त्यांनी घेतली. त्याला कारण चाफेकर बंधूंचा मृत्यू. या घटनेने सावरकरांचे हृदय हेलावले. आपल्या सोबत्यांची व जनतेची मने हलवून जागी करण्यासाठी एका रात्री विनायकाने चाफेकर बंधूंवर एक फटका रचला. 'कार्य सोडुनी अपुरे पडला झुंजत खंती नको। पुढे कार्य चालवू मिरवीत तुमच्या पराक्रमाचे आम्ही धडे।' हा फटका रचताना त्यांच्या चेहऱ्यावर एक प्रकारचे तेज चढले होते व गालावर अश्रूही ओघळत होते. इतका रसरसलेला क्रांतिकारी फटका वयाच्या १५/१६ व्या वर्षीच रचावा याचे आज कौतुक वाटते.

माध्यमिक शाळेत शिकत असताना 'हिंदू संस्कृतीचा गौरव' या शीर्षकाखाली त्यांनी लिहिलेला लेख 'नाशिक वैभव' या वृत्तपत्रात संपादकीय म्हणून दोन भागात प्रसिद्ध झाला. त्या काही वर्षात त्यांनी अनेक कविता केल्या.

न्या. रानडे, लो. टिळक यांच्यावर, तसेच तमाशाच्या फडात म्हणता येण्यासारखे पोवाडे, इ. काव्य रचनेने त्यांना मोठा लौकिक मिळवून दिला.

त्या काळातील त्यांची कविता नि देशभक्ती यांचा एकच गाभा होता तो म्हणजे भारत स्वतंत्र करणे. यावेळी त्यांनी लिहिलेल्या एका फटक्यात 'आर्य बंधु हो उठा उठा का मठासारखे नटा सदा। हटा सोडुनी कटा करू या म्लेछपटा ना धरू कदा।' असे उद्गार काढले आहेत. दुसऱ्या एका पदाच्या शेवटी ते म्हणतात 'उद्धारा आर्यजना आर्यभूमिला, त्या स्वतंत्र छत्रि आर्य ठेवाग त्वरे, प्रार्थूनिया कार्याला लागणे बरे' असे म्हणून सृष्टीक्रमाचा सिद्धांत सांगून हिंदूंना एकजूट करण्याचा इशारा देतात. 'बिंदूंचे बनते तळे हृदयि या सृष्टिक्रमासी धरा, हिंदू जे असतील सर्व मिळवुनी एकी त्वरेने करा' कवितांच्या या दोन दोन ओळीतूनही त्यांच्या त्यावेळच्या विचार प्रवाहाची दिशा स्पष्टपणे कळते.

कॉलेजात असताना 'सर्व पेशव्यात थोर पेशवे कोणते?' या विषयावरील स्पर्धेत त्यांनी निबंध लिहून पाठवला व प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळवले. पहिले माधवराव पेशवे यांना सर्वश्रेष्ठ ठरवून त्यांची कुशाग्र बुद्धिमत्ता व महान नेतृत्व याचे दर्शन त्यांनी या निबंधात घडवले.

फर्ग्युसन कॉलेजमध्ये दाखल झाल्यावर त्यांनी सहाध्यायांची मने नि मते अजमावून एक सावरकर गट स्थापन केला. या गटाने 'आर्यन वीकली' नावाने हस्तलिखित साप्ताहिक सुरू केले. देशभक्ती, वाङ्मय, इतिहास, विज्ञान अशा अनेकविध विषयावर सावरकरांनी या साप्ताहिकात अनेक शैलीदार नि उद्बोधक लेख लिहिले. सावरकरांच्या या उत्कृष्ट लेखांपैकी 'सप्तपदी' या शीर्षकाखाली लिहिलेल्या लेखात परतंत्र राष्ट्र आपली उत्क्रांती करून घेत असताना कोणकोणत्या सात टप्प्यातून जात असते याचे विवेचन केलेले होते.

विपुल लेखन करणारे लेखक या नात्याने सावरकरांचा लौकिक वाढत चालला होता. तानाजी, बाजी प्रभू या महाराष्ट्र वीरांवरचे आपले सुप्रसिद्ध पोवाडे त्यांनी याच काळात रचले. त्या पोवाड्यांनी तरुणांमध्ये व वृद्धांमध्ये स्फूर्ती निर्माण केली. ब्रिटिश सरकारने हे पोवाडे जप्त करूनही त्यांना लोकगीतांची प्रतिष्ठा प्राप्त झाली होती. हिंदू विधवांच्या दु:स्थितीवर लिहिलेल्या कवितेत निर्दय रूढी व कालविसंगत जीर्ण परंपरा यांचा खरपूस समाचार घेतला आहे. जराजर्जर नवरदेवांच्या पाशवी वासनेवर प्रखर कोरडे ओढले आहेत आणि बालविधवेचे हृदयद्रावक चित्र उभे केले आहे. या कवितेत सावरकरांचे श्रेष्ठ समाजसुधारक या नात्याने दर्शन घडते.

एका कवितेत 'विश्वात आज परि शाश्वत काय झाले?' असा प्रश्न विचारून ते पुढे म्हणतात,

'हा उन्नती अवनतीस समुद्र जातो
भास्वान् रवीही उदयास्त अखंड घेतो
उत्कर्ष आणि अपकर्ष समान ठेले
विश्वात आज परि शाश्वत काय झाले?'

प्रत्येक वस्तू अशाश्वत आहे हे सांगताना ब्रिटिश साम्राज्याचा पाडाव होणे अटळ आहे ही गर्भित कल्पना त्यात असावी.

याच काळात सावरकरांनी लिहिलेल्या अनेक संस्मरणीय लेख आणि उत्कृष्ट निबंधांपैकी एक होता - 'ऐतिहासिक पुरुषांचे उत्सव का करावे?' हा एक विचारप्रवर्तक आणि तेजस्वी निबंध होता. त्यातून त्यांचे सखोल चिंतन आणि मौलिक प्रतिभेची झेप दिसते. ते म्हणतात, 'त्या सत्पुरुषांनी आपल्यावर अनंत उपकार केले. त्यांचे स्मारक म्हणून हे उत्सव करावे. ते तरुणांना सच्छिक्षण देणारे शिक्षक आहेत. म्हणून त्यांचे उत्सव करावे!'

सावरकरांचे गद्य लेखन अत्यंत ओजस्वी शैलीचे

असे. त्यांची कल्पकता गरुडभरारी घेऊन उत्तुंग आकाशात विहरणारी होती. हिमालयाच्या उंचीशी स्पर्धा करणारी होती. त्यांची कल्पना पुढील उताऱ्यावरून येईल.

'सर्व भूतलावर पसरलेल्या हजारो भूभागांमध्ये आर्यभूमीसारखी रमणीय भूमी कोणती आहे हे पाहण्यासाठी हिमालय पर्वत उठून उभा राहिला. त्याने आपले डोके सर्व विश्वातील प्रदेश दिसतील एवढे उंच केले. तरी त्याला इतकी रमणीयता कोठेच आढळेना.'

सावरकरांनी पुढे १९०२ मध्ये काळपत्रात एक निबंध लिहिला होता. त्यात त्यांनी हिंदूंस म्हटले होते की, 'तुम्हाला जर वैभवाचे दिवस हवे असतील तर तुम्ही हिंदूच राहिले पाहिजे.'

सावरकरांचा 'मॅझिनी' हा महाराष्ट्रात अभूतपूर्व लोकप्रियता मिळालेला ग्रंथ होता. लंडनमधील पहिल्या सहा महिन्यांच्या अवधीत त्यांनी मॅझिनीच्या आत्मचरित्राचा मराठी अनुवाद लिहून काढला होता. याची प्रस्तावना २६ पानांची होती. त्यात सावरकरांनी आपल्या मातृभूमीच्या सुटकेसाठी लढण्याचा तेजस्वी संदेश तरुणांना उद्देशून लिहिला आहे.

१९०९ च्या नोव्हेंबरमध्ये बाबाराव सावरकरांना जन्मठेप, काळ्या पाण्याची शिक्षा कायम झाल्यावर सावरकरांनी वहिनीला एक ओवीबद्ध पत्र लिहिले. त्यात ते म्हणतात,

'अनेक फुले फुलती। फुलोनिया सुकोनी जाती।
कोणी त्यांची महती गणती। ठेविली असे।......
..... अमर होय ती वंशलता। निर्वंश जिचा देवाकरिता।
दिगंती पसरे सुगंधिता। लोकहित परिमलाची॥'

यातील करुणोदात्त उपमा नि जीवन सार्थक्याची ओजस्वी कल्पना हृदयाचा ठाव घेणारी आहे.

१८ महिन्यांहून अधिक काळ सखोल अभ्यास करून १९०८ सालच्या एप्रिलच्या सुमारास '१८५७ चे स्वातंत्र्य समर' हा संस्मरणीय मराठी ग्रंथ त्यांनी लिहून पुरा केला. या ग्रंथाने जागतिक साहित्य भांडारात स्वयंविशिष्ट पहिले स्थान पटकावले. साऱ्या जगभर या ग्रंथाचा बोलबाला झाला. मागाहून अनेक भाषांमधून त्याच्या आवृत्त्या प्रसिद्ध झाल्या.

१९०६ साली हिंदुस्थानात त्यांनी जी भाषणे केली त्याबद्दल १९१० मध्ये इंग्लंडमध्ये त्यांना अटक करण्यात आली. व्हिक्टोरिया स्थानकावरून त्यांना बोस्ट्रीट पोलिस ठाण्याला नेण्यात आले. त्याच सुमारास त्यांचा लहान मुलगा हे जग सोडून गेला. बाबाराव जन्मठेपेच्या, काळ्यापाण्याच्या शिक्षेवर होते तर नारायणराव नासिक कटाच्या प्रकरणात पुन्हा पकडले गेले होते. या सर्व घटनांचा व आपल्या अटकेचा कुटुंबावर झालेला आघात सुसह्य करावा या दृष्टीने त्यांनी आपले अखेरचे मृत्यूपत्र लिहून यशोदा वहिनींना पाठवले. आपल्या कुटुंबाची वाताहात कोणत्या भव्य दिव्य ध्येयाप्रीत्यर्थ झाली आहे याचे काव्यमय वर्णन ते या मृत्यूपत्रात करतात. 'झाल्या तदा प्रियकरांसह आणाभाका। त्या सर्व देवि वहिनी स्मरती तुम्हा का। बाजी प्रभू ठरू दे युवसंघ सर्व। आम्ही चितोर युवती सगर्व .... माझा निरोप तुज घेउन हाच देवी। हा वत्स वत्सल तुझ्या पदि शीर्ष ठेवी। सप्रेम अर्पण असो प्रणती तुम्हा ते। आलिंगन प्रियकरा मम अंग नेते' असा धीराचा संदेश देऊन ते म्हणतात, 'की घेतले व्रत न हे आम्हि अंधतेने। लब्ध प्रकाश इतिहास निसर्गमाने। जे दिव्य दाहक म्हणुनि असावयाचे। बुध्याची वाण धरिले करि हे सतीचे।'

अगदी लहानपणापासून 'महाकाव्य' म्हणजे काय हे कळत नसल्यापासून त्यांच्या मनात महाकाव्य रचावे अशी आकांक्षा होती. परंतु कार्य प्रपंचामुळे ते शक्य झाले नाही. अंदमानात असताना त्यांनी महाकाव्याचा संकल्प केला.

---

क्रोध ही दुर्बलतेची निशाणी आहे. - स्वामी दयानंद सरस्वती

येथे वाचन व लेखन हा महान अपराध गणला जात असे. पण सावरकरांनी तेथे काव्याचा प्रकाश निर्माण केला. आधीच्या राजकीय बंदिवानांना लेखन वाचनाच्या सोयी उपलब्ध होत्या पण सावरकर हे असे जागतिक कीर्तीचे एकटे बंदिवान की ज्यांनी आपले उत्कृष्ट काव्य हातापायात बेड्या असूनही घायपाताच्या काट्यांनी किंवा अणकुचीदार दगडांनी कारागृहाच्या भिंतींवर लिहिले. या काव्याचा पसारा १० सहस्र ओळींचा होता. आधी भिंतीवर व मागाहून स्मृतीवर हे काव्य कोरून त्यांनी जगाला आश्चर्यचकित करून सोडले. त्यातून त्यांची इच्छाशक्ती नि चिकाटी असामान्य दांडगी होती हे दिसते.

भारतीय राजकारण आणि काव्य या क्षेत्रात 'सावरकर म्हणजे देशभक्ती' हे समीकरण रूढ झाले. स्वातंत्र्यलक्ष्मीची उपासना ही त्यांच्या एकंदर काव्याची स्थायी कल्पना. 'तुजसाठी जनन ते मरण। तुजवीण जनन ते मरण।' अशी ग्वाही त्यांनी स्वातंत्र्यलक्ष्मीला दिली होती. 'गेला देश अहो रसातळाला। स्वातंत्र्य प्रासाद अहा जळाला।' या वेदनेच्या तळमळीतून त्यांची कविता निर्माण झाली. त्यांच्या कवितांनी आणि पोवाड्यांनी असंख्य राष्ट्रभक्तांना स्फूर्ती दिली होती. स्वराज्य नि स्वधर्म यांच्या निःस्सीम प्रेमाची शिकवण सावरकरांच्या प्रमाणे दुसऱ्या कोणीही दिली नाही.

उपमा कौशल्य, संतकवींचे माधुर्य आणि लेखणीला मराठी भाल्यांचे लखलखीत तेज ही त्यांच्या काव्यातील वैशिष्ट्ये. त्यामुळे मराठी कवितामालिकेत सावरकरांना अग्रस्थान द्यायला हवे. त्यांचे विचार रसरशीत व दाहक असत. त्यांची सृजनशील कल्पनाशक्ती नेहमीच उत्तुंग भरारी घेत असे. याचा अनुभव 'जगन्नाथाचा रथ' या कवितेत येतो. काळाच्या उतरणीवरून ही मिरवणूक चालली असताना मार्गांवर या रथाखाली चुरडलेल्या नक्षत्रमालिकांचा धुरळा मागे उडत आहे ते पाहून कविला आश्चर्य वाटते. तो विचारतो, 'दिक्क्षितिजांचा दैदिप्य रथ तुझा सुटता, या कालपथाच्या अतुट उतरणीवरती, नक्षत्रकणांचा उडे धुरळा पडता'

भव्योदात्त कल्पनाविलासाप्रमाणे कोमल कल्पनाविलासही त्यांच्या काव्यात दिसतो. 'कमला' या काव्यात आरंभी फुलबागेचे वर्णन आहे. एका बागेतली कमळे ही सावरकरांना यमुनेत स्नान करण्यासाठी उतरलेल्या नि लाजलेल्या गोपींप्रमाणे वाटतात. भुंगा हा मदनाचा दलाल असून तो मधाच्या मोबदल्यात सुमलोकातील प्रेमिकांची चुंबने पोहोचवतो. उद्यानात विहार करण्यासाठी रात्री चोरून अप्सरा येतात. पहारेकरी त्यांच्या या अपराधाची चौकशी करताना इतर सामान्य अपराध्यांप्रमाणे अंगठ्याचे ठसे न घेता त्यांच्या चुंबनाचे ठसे घेत. हे ठसे म्हणजेच बागेत उमललेली ही जाईची फुले.

कोंढाणा लढवताना तानाजी धारातीर्थी पडला. तेव्हापासून सागराला पृथ्वीचा मत्सर वाटू लागला. कारण सागर हा रत्नाकर म्हणून ओळखला जातो पण तानाजी सारखे रत्न पृथ्वीच्या पोटात राहिले म्हणून 'सिंहगडाच्या पोवाड्यात' सावरकर म्हणतात, 'मग त्या गडची भूमी ठेवी तानाजीस उदरी । तेव्हापासुनी रत्नाकर बहु तिचा द्वेश करी ।'

अंदमानात उमललेली ही काव्यसुमने 'रानफुले' या शीर्षकाखाली फुलली. 'बेडी, कोठडी, जगन्नाथाचा रथोत्सव, निद्रे, मरणोन्मुख शय्येवर' या कवितांना तत्वचिंतनाची बैठक आहे. मरणोन्मुख शय्येवर ही कविता अंदमानात रुग्णालयात असताना १९१९ साली लिहिली. 'मरणोन्मुख शय्येवर' त्यांना आता मृत्यूचे भय उरले नव्हते. व्यक्तिगत 'मी' आणि 'विपलांतचि हा माझा मी हि की जरी । विश्वाच्या अंतर्हित 'मी' त मावळे । तरि मरणा ।! मरण न तू! मरण मुक्तिची विपलांतचि परि विनंती इतकीची असे । स्वदेशाच्या स्वातंत्र्यासाठी ते लढत होते. त्या यज्ञात अस्थी अस्थींनी आपल्या देहाची आहुती देऊन 'आज असे

---

बौद्धिक स्वातंत्र्य संपादणे व धैर्याने त्याचा उपयोग करणे हे प्रगतीचे मूळ होय.

शेष राहिली राख यौवनाची मम' असे ते म्हणाले होते. त्यांच्या काव्याचा आणखी एक विशेष म्हणजे त्यांनी प्रथमतः 'वैनायक' हा मुक्तछंद मराठी कवितेत रूढ केला.

साहित्यिक या नात्याने महाराष्ट्र शारदेच्या मंदिरात सावरकरांना अजोड स्थान प्राप्त झाले होते. त्यांच्या तेजस्वी प्रतिभेचे विविध पैलू होते. जहाल लेखक, व्यासंगी विद्वान, कृतिशील इतिहासकार, ग्रंथकार, नाटककार, कादंबरीकार, महाकवी अशा विविध रूपात त्यांनी साहित्य संचार केला. त्यांनी आपली लेखणी, वाणी केवळ देशाच्या कामासाठीच वापरली. ती देशभक्तांना स्फूर्ती देते, वाचकांच्या अंतःकरणात नवी आशा फुलवते. आपल्या लेखन सामर्थ्यावर ते साहित्याद्वारा स्वमताचा प्रचार करीत. प्रचारक या नात्याने त्यांना तोड नव्हती. भाषाशुद्धीचा प्रश्न असो की समाजसुधारणेचा. सावरकर ज्या ज्या वेळी लेखणी हातात घेत तेव्हा त्यांची लेखणी रणमैदानावर उतरलेल्या योध्याप्रमाणे प्रतिपक्षावर तुटून पडत असे. त्यांच्या लेखनात कोठेही रुक्ष बोजडपणा आढळत नाही. प्रतिमा व अनुभव यांनी त्यांचे लेखन समृद्ध असे. त्यांच्याइतके प्रक्षुब्ध विचारमंथन कोणी घडवले नाही. विरोधकांना आपल्या चिकित्सक बुद्धीच्या कडक असूडाने फटकारून काढले. आणि त्यांची नांगी मोडली. यंत्र, गाय, मनुस्मृतीतील महिला, दोन शब्दात दोन संस्कृती, मनुष्याचा देव आणि विश्वाचा देव, जात्युच्छेदक निबंध इ. विषयांवर त्यांनी लिहिलेल्या बुद्धिवादी लिखाणाने त्यांना श्रेष्ठ समाजसुधारकांच्या मालिकेत अढळ स्थान प्राप्त करुन दिले.

रत्नागिरीला स्थानबद्ध झाल्यावर थोड्याच दिवसात 'हिंदू पद पादशाही' हा आपला ग्रंथ लिहिला. या ग्रंथात त्यांनी उदयोन्मुख मराठ्यांनी अंतःकरणात बाळगलेली एकच आस आणि स्वधर्म व स्वराज्य यांनी हिंदूंना पुनःप्राप्ती करुन देण्याची त्यांची महत्त्वाकांक्षा यांचे उज्वल दर्शन घडवले आहे. कुशाग्र बुद्धिमत्ता डौलदार शैली, श्रेष्ठ विचारप्रणाली व यथार्थ स्वाभिमान हे त्यांचे गुण या ग्रंथात दिसतात. स्थानबद्धतेच्या काळात त्यांनी लिहिलेला दुसरा महान ग्रंथ म्हणजे 'माझी जन्मठेप'. मराठी भाषा जोपर्यंत अस्तित्वात आहे तोपर्यंत अविरत टिकून राहील असा हा ग्रंथ. लिहो डॉइरा, डॉस्टोव्हस्की, ऑस्कर वाइल्ड यांच्या आत्मचरित्रपर ग्रंथातही कारावासाचे चित्रण आहे पण गुणवत्तेच्या दृष्टीने 'माझी जन्मठेप' हा ग्रंथ सर्वांमधे विशेष श्रेष्ठ ठरेल. या ग्रंथाचा गुजरातीतही अनुवाद झाला होता यावरून त्याचे श्रेष्ठत्व लक्षात येईल.

नाटककार या नात्याने ते आपल्या नाटकातील कथावस्तूना फारसे महत्व देत नसत. विविध पात्रांच्या तोंडून तेच बोलत असत. स्थानबद्धतेत असताना त्यांनी लिहिलेली तीनही नाटके अत्यंत प्रभावी ठरली. 'उःशाप' हे त्यांचे पहिले नाटक १९२७ साली रंगभूमीवर आले. पतितवर्गाचा उद्धार व अस्पृश्यता निवारण हा या नाटकाचा विषय होता. यातून जातीय वैमनस्य माजेल म्हणून सरकारने या नाटकावर बंदी आणली. पण सावरकरांनी ठामपणे, कौशल्याने आपली बाजू मांडून बंदी उठवून लावली.

'संन्यस्त खड्ग' हे त्यांचे दुसरे नाटक. बुद्धाच्या जीवनचरित्राच्या पार्श्वभूमीवर लिहिलेले. यात अहिंसा तत्त्वावर प्रखर टीका आहे. ही अहिंसा राष्ट्राचे रक्षण करण्यास उपयोगी पडत नाही तर शस्त्रच प्रभावीपणे उपयोगी पडते हे सांगताना यातील एक पात्र म्हणते, 'आम्ही भिक्षू, अहिंसा हे आमचे व्रत. ठोकणे, मारणे, पिटणे हे हिंसात्मक शब्ददेखील आम्ही उच्चारत नाही. कारण ते पाप मानतो. हे अहिंसाव्रत आम्ही इतक्या कडकपणे पाळतो की सापास ठोकत नाही. चकाट्या पिटीत नाही, गप्पादेखील ठोकत नाही, हाकेला मारत नाही. आम्हा भिक्षूंना जात नसते, राष्ट्र नसते, ज्याचा जय होईल तो आमचा राजा.' हे नाटक लिहिण्यापूर्वी बुद्धाच्याच जीवनावर त्यांनी 'बोधिसत्त्व' नावाचे नाटक लिहायला घेतले होते पण ते अपूर्ण राहिले.

---

जे हृदयात सतत सलत रहाते, खटकत रहाते त्याचेच नाव पाप होय. - महंमद पैगंबर

१९३४सालात रंगभूमीवर आलेले त्यांचे 'उत्तरक्रिया' हे तिसरे नाटक. पानिपतच्या युद्धानंतरचा काळ त्यात रंगवला आहे. या नाटकाचे कथानकच पानिपतचा सूड घेण्याच्या कल्पनेवर आधारलेले आहे. त्यामुळे यातील सर्व पात्रे सूडाची भाषा बोलताना दिसतात. 'उत्तर हिंदवर पानपतचा सूड घेण्यासाठी स्वारी करण्याचे माधवरावांनी निश्चित केले असल्याचे सांगतो' आणि त्याला निरोप देणारी त्याची पत्नीही लगेच त्याच भाषेत आवेशाने म्हणते 'हिंदू वीरांनो, जा भाऊचा सूड घ्यायला, पानपतचा सूड घ्यायला.'

सावरकरांचे व्यक्तिमत्त्व मुळातच संपन्न व क्रांतिप्रेरक होते. त्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सरळ आविष्कारही त्यांच्या वाङ्मयात विलक्षण तेज व बळ निर्माण करू शकला. बंदुका घेण्यास प्रवृत्त करते ती लेखणीच हे त्यांना कळले होते.

काव्य, नाटक, कथा, कादंबरी इ. ललित साहित्यातून लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाचा आविष्कार सहजपणे होतो. आत्माविष्काराला अनुकूल असे ते वाङ्मयप्रकार आहेत. परंतु चरित्र, इतिहास, निबंध इत्यादी आत्मविष्काराला पोषक नसलेल्या अशा वस्तुनिष्ठ वाङ्मय प्रकारातूनही सावरकरांच्या व्यक्तिमत्त्वाचा आविष्कार होताना आढळतो. विषयाची केलेली निवड, त्या विषयाभोवती उभा केलेला आशय, त्या आशयाच्या अभिव्यक्तीत विशिष्ट तत्त्वांवर देण्यात आलेला भर या आशयातील विचारांचा व्यक्तिनिविष्ट दृष्टिकोनातून लावण्यात आलेला अर्थ इ. गोष्टीतून सावरकरांचे व्यक्तिमत्त्व तेथे प्रगट झाले आहे.

**शैला जोगळेकर**
३/१९, हेदवकर वाडी नं. १,
गोखले रोड (साउथ), दादर, मुंबई ४०० ०२८.

***

(पान क्रमांक १४ वरून)

**ठाणे महानगरातील वाहतुकजन्य प्रदूषण : व्याप्ती आणि उपाययोजना**

पुस्तक वाचून यातील सूचनांचे महापालिकेचे आयुक्त श्री. बक्षी यांनी कौतुक करून त्या अंमलात आणाव्यात म्हणून स्वीकारल्याही आहेत. यातच पुस्तकाचे श्रेय आहे असे वाटते. लेखकाच्या मते स्वयंसेवी संघटनांच्या माध्यमातून हा प्रश्न वारंवार चर्चेत राहण्याची आवश्यकता आहे. वाहतुकीमुळे होणारे प्रदूषण हे विविध नवनव्या स्वरूपात आपल्याला सामोरे येऊ शकते. म्हणून सातत्याने या विषयाचे परीक्षण, अभ्यास व समस्या समाधान अशी संरचना महानगरपालिकेत बनण्याची आवश्यकता आहे.

पुस्तकाचा विषय जरी वेगळा असला तरी लेखकाने हे पुस्तक अधिक माहितीपूर्ण व्हावे असा प्रयत्न केला आहे. ही माहिती नकाशे, तक्ते, आराखडे यांच्या मदतीने दिल्याने अधिकच सुलभ वाटते. मला वाटते असे नावीन्यपूर्ण पुस्तक सर्वांना आवडेल असेच आहे विशेषत: पर्यावरणाविषयी जे जागरूक आहेत त्यांना. या पुस्तिकेमुळे या गंभीर विषयाबद्दल सर्वसामान्य लोक आणखी जागरूकपणे विचार करू लागण्यास मदत होईल अशी आशा आहे.

**सौ. भारती जोशी**
ग्रंथपाल,
वि.प्र. मंडळाचे तंत्रनिकेतन, ठाणे.


***

# निरोप समारंभ

*निरोप म्हणजे विरह.... निरोप म्हणजे दुरावा... निरोप अपरिहार्यच असतो. माणसं एकमेकांजवळ येतात ती लांब जाण्यासाठीच.*

*-संपादक*

निरोप हा कुठलाही असो तो क्षण अनेक जुन्या आठवणींना उजाळा देणारा आणि भावविव्हल होणारा असतो.



दोन महिन्यांपूर्वी आमच्या ऑफिसमध्ये एका व्यक्तीचा निरोप समारंभ झाला. त्यांचे नाव साळवी. अतिशय सद्‌गुणी, शांत, नम्र असे व्यक्तिमत्त्व. माझ्या आठवणीत त्यांचे कोणाशी भांडण झालेले नाही. दुसऱ्यांवर प्रचंड विश्वास. समारंभासाठी अनेक साहेब मंडळी उपस्थित होती. त्यांच्याबद्दल अनेक गौरवोद्‌गार काढण्यात आले. खाणे-पिणे झाले. त्यांना एक स्मृतिचिन्ह देण्यात आले. एक चांदीची विघ्नहर्त्याची मूर्ती भेट देण्यात आली. या सर्व प्रसंगाने ते स्वत: इतके भावविव्हल झाले की भाषणात काही बोलू शकले नाहीत. त्यांचा एक अतिशय चांगला शिकण्यासारखा गुण म्हणजे 'मान द्यावा आणि मान घ्यावा' घर सोडल्यावर ऑफिसमध्ये एकमेकांच्या सहकार्याने वर्षानुवर्षे काम करणे. इतकेच काय पण एकमेकांची सुखदु:खेही वाटून घेणे. या सर्व गोष्टी आजपासून संपणार होत्या. नोकरीला लागताना मनात भीती होती. आजही अनुभव असूनही पुढे काय करायचे या विचाराने मन विचलित होत होते. हा निरोप समारंभ प्रत्येक नोकरदाराच्या जीवनात एकदा तरी येतोच.

शाळेचा निरोप समारंभ असाच मन हेलावणारा असतो. शाळेत दाखल होताना भीतीने रडत रडत गाळण उडालेली असते, पण एकेक पायरी वर चढून जाताना कोरी पाटी भरायला लागलेली असते. मित्र-मैत्रिणी, गॅदरींग, सहल, स्पर्धा, परिक्षा, नवीन नवीन शिक्षण यांच्या अनेक आठवणी स्मृतिपटलावर दाटून आलेल्या असतात. अनेक अनुभवातून आत्मविश्वास वाढला जातो आणि समोर विस्तारलेले क्षितिज ते पाहण्याची नजर शाळाच देत असते. आज एखाद्या क्षेत्रात पुढे येण्याचे ज्ञान व एखादी कला जोपासण्याचे काम शाळेने केलेले असते. 'गुरुः ब्रह्मः' किंवा 'तमसो मा ज्योतिर्गमय' म्हणत श्लोक म्हणायचे. रोज चिंतन वाचले जायचे आणि या सुरवंटाचे फुलपाखरु झाल्यावर उडून जायचे. पण या दगडमाती विटांच्या भिंती आम्हाला अनेक गोष्टी शिकवून गेल्या. आणि आज यांचा निरोप घ्यायचा. सतत डोळ्यापुढे धुकं दाटून येतं. हा निरोप समारंभ तुम्हाला उद्याचे आदर्श नागरिक बनवण्यासाठी, व्यक्तिमत्त्व खुलवण्यासाठी असतो. या निरोप समारंभातून उद्या आपण अभिमानाने सांगू शकतो मी या शाळेचा माजी विद्यार्थी आहे.

परदेशात कायम स्थायिक होण्यासाठी कुटुंबातील काही व्यक्ती जाणार असतात. साता समुद्रापलिकडे गेल्यावर इच्छा असूनही लगेच भेटणे शक्य नसते. त्यावेळी निरोप घेताना जाणारा काळ फारच लहान वाटत असतो. जाणारी व्यक्ती जायचे म्हणून अनेक दिवस आनंदात असते,

आपले दुःख काहीच नसते, यापेक्षा मोठमोठी दुःखे पेलणारी कितीतरी माणसे असतात.

पण तो क्षण जवळ आला की आपले बरेच काही राहिले आहे या भावनेने हतबल होते.

मुलगी सासरी जाते तेव्हाचा प्रसंग असाच मने हेलावणारा असतो. अनेक दिवस उत्साह आनंद भरून राहिलेला असतो, पण प्रत्येक निरोप घेताना अंत:करण जड होते. सतत आपल्या सावलीत वाढलेली लेक कायमचं घर सोडून जाणार असते. ती सुखाने संसार करेल यातही आई-वडिलांना आनंद असतोच पण तरीही तिला निरोप द्यावाच लागतो.

असे अनेक प्रकारचे निरोप समारंभ असतात. त्यातून वाट्यास येतो विरह, दुःख. पण काही निरोपातून काही चांगलेही घडत असते. परदेशी उच्च शिक्षणासाठी जाणारा मुलगा निरोप घेताना अनेक आशा आकांक्षा मागे ठेऊन जातो. हे जीवनच असे आहे. अनेक हृद्य प्रसंगांनी बांधलेले.परंतु हे निरोप पूर्वनियोजित असतात. एखादा असाच रंगलेल्या मैफिलीतून निघून जातो आणि आपला निरोप घेऊन आनंदात विलिन होतो.

**सौ. वंदना सं. प्रसादे**
ठाणे (प)
फोन नं. - ५४० ०६ ५२

***

मुलगा : (घाई घाईने घरात येत.)
बाबा बाबा, मला एक सफरचंद द्या, लवकर
बाबा - का रे ?
मुलगा - बाबा समोरच्या इमारतीतील डॉक्टर काकांच्या घराची काच मी मारलेल्या बॉल मुळे फुटली, मी सफरचंद खाल्लं की डॉक्टर मला काही करणार नाही.
बाबा-ते कसं ?
मुलगा - ॲपल अ डे, कीपस् डॉक्टर अवे !

## निरोप

निरोप आता अपुला घेता
लोभ असू द्यावा
फुले जीवनी जिथे वेचली
परिमल सोबत यावा.

कधी मिळाली फुले सुगंधी
कधी बोचले काटे हाती
परी जीवनी नित्य मिळाले
हवेहवेसे खूप सोबती

जगात आंबट चिंबट काही
गोड त्यातले घ्यावे
कधी कुणाला दुःख दिले मी
आपण विसरावे.

जीवन आहे एक चिरंतन
प्रवास जेथे नसे वेदना
आहे केवळ सहवासाच्या
गोडी संगी विरह भावना

**श्री. अरविंद नी. ओक**
दिनकर सोसायटी,
अग्रवाल हॉल जवळ, डोंबिवली (पूर्व)

***

# श्री रामदास स्वामींचे 'प्रपंच विज्ञान' - एक नितांत सुंदर प्रबंध

*श्री रामदासस्वामींवरील अनेक ग्रंथ हे मराठी साहित्यांचे भूषण आहे. असाच एक जुना ग्रंथ 'श्री रामदासस्वामींचे प्रपंच विज्ञान' या विषयीचे दास नवमीच्या निमित्ताने हा चिंतनवजा परिचय* -कार्यकारी संपादक



मध्यप्रदेश शासन साहित्य परिषद या अभिनव संस्थेने मराठी भाषा वाङ्मय यांचा पुरस्कार करण्याचे योजिले व या पुरस्कारात एक योजना अशी केली की काही वक्त्यांना आपल्या राजधानीच्या नगरात विशेष प्रकारच्या विषयावर व्याख्याने देण्यासाठी बोलावले. या साहित्य परिषदेने श्री. श्री.म. माटे यांना १९५५ साली फेब्रु. १,२, ३,४, या चार दिवशी स्वातंत्र्य-मंदिरात 'श्री रामदास स्वामींचे प्रपंच विज्ञान' या विषयावर चार व्याख्याने देण्यास बोलावले व प्रबंधही लिहिण्यास सांगितले. तो प्रबंध म्हणजे हे पुस्तक.

'प्रपंच विज्ञान' यातील प्रपंच या व्यापक अर्थांच्या दृष्टीनेच या प्रपंचात अंतर्भूत होणारे जे राजकारण, त्याचा विचार केलेला आहे. मात्र हा सर्व विचार मुख्यत: स्वामींच्या वाङ्मयाच्या आधारे केलेला आहे, असे लेखक आपल्या प्रास्ताविकात म्हणतो.

प्रबंधाच्या सुरुवातीला 'महाराष्ट्राचा भाग्यकाल' याबद्दल लिहिताना लेखक श्री. म. माटे म्हणतात, तुकाराम, रामदास व शिवाजी हे तीन महापुरुष एकाच वेळी जन्माला घालण्याची ही योजना खरोखरच अलौकिकच म्हटली पाहिजे. तुकाराम, रामदास, शिवाजी ही बुद्धीची, इच्छाशक्तीची आणि पराक्रमाची मोठी भव्य स्फुरणे होत. या तिघांच्या शक्ती आणि त्यांच्या मनाची चलनवलने निरनिराळी होती. हे तिघे एकाच वेळी जन्माला येणे हा बलवत्तर योग खरा; पण त्याहीपेक्षा महत्त्वाचा योग म्हणजे हा की एवढे प्रचंड पुरुष राष्ट्राच्या जीवितात एकाच वेळी नांदत असता ते परस्परांशी भांडले नाहीत! एवढी ही बुद्धीमान माणसे आणि त्यांचे एकमेकांशी मतभेद झाले नाहीत ही मोठी नवलाची गोष्ट आहे. ते एकमेकांशी भांडले तर नाहीच पण एकमेकांच्या कार्याला पूरक बनले. आणि असे बनण्याला शरणागतीचे जे एक सूक्ष्म औदार्य लागते ते या तिघांनीही दाखवले. आणि त्यामुळेच तेव्हाच्या महाराष्ट्राला एक अकल्पित वैभव प्राप्त झाले.

'स्वामींनी १२ वर्षे भारत-भ्रमंती केली, स्वामी हे मूळचे निवृत्तीवादी आणि प्रपंच पराङ्मुख होते. परंतु भारत खंडातील परिस्थितीचे अवलोकन केल्यावर निवृत्ती नव्हे तर प्रपंचवृत्तीच समाजाला शिकविली पाहिजे आणि दासळत चाललेला समाज तत्त्वज्ञान आणि प्रपंच विज्ञान यांच्या बळावर सावरून धरला पाहिजे असे त्यांना वाटू लागले. आणि मग या प्रपंच विज्ञानाच्या कडक रूपातून त्यांच्या राजकारणी विचारांचा उद्भव झाला.

समाज रचनेचा अभ्यास करताना रामदासी वाङ्मयातील दासबोध व दासबोधेतर वाङ्मय हेच मुख्यत: पाहिलेले आहे. ज्ञानेश्वरांच्या काळापासून चालत आलेल्या भक्तीमार्गातच रामदासस्वामी वाढलेले होते. आणि त्या

मार्गात राहूनच त्यांनी आपला पराक्रम केला. ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम आणि रामदास या पंचकाच्या वाङ्मयाचा अभ्यास करताना हिंदू समाजाच्या बांधणीकडे लक्ष देणे अवश्य भासते. हिंदू समाज रचनेचा आणि वाढीचा विचार जर केला नाही तर संतवाङ्मयातील कित्येक स्थळे दुर्बोधच राहतील.

आर्येतर वंशखंड भारतात सर्वत्र पसरलेले होते आणि टिकून होते. आर्य संस्कृती ही प्रसरणशील, आक्रमक आणि चपळ होती. आणि म्हणूनच अखिल जंबुद्वीपाचा आक्रम तिने करून टाकला. या संस्कृतीने ठिकठिकाणच्या वंशखंडांना धंदे उत्पन्न करून दिले. ती संस्कृती मोठी की जी अनेक व्यवसाय उत्पन्न करते आणि या व्यवसायांच्या द्वारा वैभव संपादिते. आर्य संस्कृतीने अनेक व्यवसाय उत्पन्न केले आणि या व्यवसायात ठिकठिकाणच्या वंशखंडांना गुंतवून घेतले.

आर्येतर वंशखंडांनी व्यवसायाच्या द्वारा समाजात प्रवेश केला. पण त्यांनी आपली दैवते बरोबर आणली. काशीपासून रामेश्वरपर्यंत या दैवतांची गजबज सर्वत्र झाली होती. त्यापैकी ५७ देवतांची नावेच येथे उद्धृत केली आहेत. हे सर्व क्षेत्र-देव होत. महाराष्ट्रातील संतांनी क्षेत्र देवतांची म्हणजेच क्षुद्रदेवतांची चालू झालेली ही स्वारी मारून काढण्याचा प्रचंड उद्योग केला आणि या उद्योगाच्या खुणा संतवाङ्मयात प्रभूतपणे सापडतात. या देवांना आणि देवींना पिटाळून देऊन त्याठिकाणी विठ्ठलाची आणि रामकृष्णाची स्थापना करणे आपला जिवीत हेतूच आहे असेच जणू काही संतांनी मानलेले होते. ते त्यांनी आपले मिशन बनविलेले होते. व यासाठी ते ज्ञानेश्वरांची, एकनाथांची, तुकारामबुवांची साक्ष त्यांच्या त्यांच्या काव्यातून देतात.

तैमूरलंग आणि महमद तुघलक यांची आत्मकथने देऊन त्यांच्या हिंदुस्थानवरील आक्रमणामागे हिंदुधर्माच्या विध्वसनाचा हेतू होता याची स्पष्ट कल्पना येते. रामदासांनी आपल्या भारत भ्रमंतीमध्ये यावनी अतिक्रमणाचा परिणाम स्वरूप असलेला हा विध्वंस प्रत्यक्ष पाहिला होता.

रामदासस्वामींनी अखिल भारतात पायपीट केली. काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत आणि कामरूपापासून काठेवाडपर्यंत तेव्हाची सर्व प्रसिद्ध तीर्थे रामदासांनी पाहिली. पण एवढ्यानेच झाले नाही. मोठमोठाले डोंगर, गुहा, अरण्ये, पठारे यातून हिंडण्याचा त्यांना हव्यासच होता. अशी १०२९ गावांची नावे असलेला कागद समर्थ वाङ्मयात आहे. त्या स्थळांची नामावली पुढे सापडते.

भ्रमंतीमध्ये धर्माची व समाजाची पडापड पाहिली आणि 'झाल्या दुःखराशी' असा आक्रोश स्वामींनी केला.

येक देव दुराचारी मोडीला बळें।
येक देव नेऊन घातला पायातळी।

अशी दुःखराशीची कारणे सोदाहरणासहीत दिली आहेत. व दिनकर गोसावींची साक्ष पण आहे.

'समाजाचे सम्यक् दर्शन' यात इतर देवताना पिटाळून लावताना, अपसमज लुच्चा गुरूंची गुरूगुर, मंत्रतंत्रांची पुडाई, अनेक ब्राम्हणांना आलेली अवकळा, लहानमोठ्या हजारो देवतांची पूजाअर्चा हे सर्व प्रकार हाणून पाडण्याचे काम संतांनी कसे आरंभिले होते याचे दर्शन घडविताना मुलतानी कारणाने समाजात अंदाधुंदी माजली होती. अवर्षणामुळे वा अतिपावसामुळे लोकांवर आलेली ही आपत्ती पाहून रामदासांचे सामाजिक मन खरोखर पिळवटून निघाले व टाहो फोडून ते म्हणाले, 'जन बुडाले बुडाले. काही मिळेना मिळेना, मिळेना खायला, ठाव नाही रे नाही रे, नाही रे जायाला.'

तसेच 'हे लहानपणी शक्य आहे' या शिर्षकाखाली 'चिंता करितो विश्वाची' हे गंभीर उद्‌गार बारा वर्षांच्या रामदासांनी काढले असण्याची शक्यता पटविताना त्यांनी ज्ञानेश्वरांबरोबर इतर पाश्चात्य देशातील गॅलिलिओ, न्यूटन,

रॉजर बेकन, मार्कोनी व मार्क्स यांची उदाहरणे देऊन हे शक्य आहे असे पटवून दिले आहे.

आधीचे संसार त्यागाचे असलेले मत भ्रमंतीमुळे समाजाची परिस्थिती बघून संसार स्वीकारापर्यंत बदलते. हे त्यांच्याच करुणाष्टकातील संसाराचे उत्कृष्ट वर्णन देऊन व दासबोधाच्या आरंभीच्या समासातील मानवी देहाचे बीभत्स वर्णन व नंतर त्याच देहाची उपयुक्तता देऊन दाखवले आहे.

'दुखस्था' या शीर्षकाखाली ब्राह्मण व क्षत्रिय समाज खालावले होते व विशेषत: ब्राह्मण समाजाची पाडापड धीर खुंटण्याइतपत आणि उद्वेग उत्पन्न होण्याइतपत झाली होती हे दिनकर गोसावी यांच्या 'स्वानुभव दिनकर' मधील ओव्यांनी रामदासांच्या, तुकारामबावांच्या व एकनाथांच्या मन:स्थितीतून दाखवली आहे.

या अशा पडापड झालेल्या ब्राह्मण व क्षत्रिय समाजाला हाक ठोकणे हे बरोबर होते हे सांगताना शहाजी व शिवाजी राजांमुळे क्षत्रियांसाठी हे काम चालू झालेच होते व ब्राह्मणांसाठी स्वामींनी मतप्रचाराचा झपाटा सुरु केला. अखंड प्रवास केला. शिष्य मिळविले, मठस्थापना केली व आपली मते पढवून पढवून महन्त निर्माण केले. स्वामींनी ११०० मठ स्थापन केले असे म्हणतात. 'समर्थप्रताप' या गिरीधर स्वामींच्या ग्रंथातील ८३ मठांचे महंत व त्यांची ठिकाणे तसेच ३२ शिष्यांची नावे पुढे दिली आहेत.

वर्णकर्मकल्पनेविषयी लिहिताना एका एका वर्गाविषयी ज्ञानेश्वरांचे मत सांगितले आहे. त्याचबरोबर एकनाथांच्या, तुकारामबावांच्या व रामदासांच्या अपेक्षा सांगितल्या आहेत. शेवटी स्वामींचे सामाजिक धोरण हे ब्राह्मण, क्षत्रियांना आवाहन करून 'ब्राह्मण मंडल्या मेळवाव्या' असे होते हे सांगताना स्वराज्याची स्थापना झाल्यावर देशोदेशीच्या मंत्रीमंडळाचे मुख्यमंत्री ब्राह्मणच होते हे निदर्शनास आणले आहे.

लोकांना शुद्ध ब्रम्हाची ओळख करून द्यावी हे स्वामींच्या प्रपंच विज्ञानातील कलम होते. हे सांगताना 'अहं ब्रह्मास्मि' हा ही अहंतेचा भ्रम आहे असे सांगितले आहे. जगदाकार प्रकृतीचाच आपण एक अंश आहोत आणि ही जगदाकार प्रकृती कल्पान्ती नष्ट होऊन अविनाशी ब्रह्म तेवढे शाशवत राहणार आहे असा सांगण्याचा कटाक्ष आहे.

'माझी काया जाई खरे ।परि मी आहे जगदाकारी।' शेवटी जगात दोनच वस्तू आहेत, एक चंचल, दुसरी निश्चल. पैकी परब्रम्ह हे निश्चल आहे आणि ते अविनाशी आहे. दुसरे जे चंचल आहे ते विनाशी आहे. दिक्कालाने अनवच्छिन्न असे जे ब्रम्ह तेच तेवढे शिल्लक रहाते हाच विचार स्वामींनी श्रोत्यांना कोणतीही भीडभाड न ठेवता सांगितले.

स्वामींच्या प्रपंच विज्ञानाला अनेक अंगे आहेत हे सांगताना 'घोषणातून सुटका' या शीर्षकाखाली श्री. माटे सांगतात, स्वामी शिष्यशाखा तयार करीत होते. स्वत: भ्रमंती करीत होते प्रतिपादने, कीर्तने करीत होते. माणसांचा संग्रह करीत होते. शंका समाधान करीत होते आणि अशा रितीने एका पंथाची प्रस्थापना करीत होते. श्रोत्यांच्या अंगी विचक्षणा असली पाहिजे, स्वत: विचार करण्याची शक्ती त्यांच्या अंगी असली पाहिजे, असे त्यांचे मत होते. अर्थातच मानवावर कायमची झापड घालून बसलेल्या काही काही सुत्रांतून श्रोत्यांना व मुख्यत: आपल्या शिष्यांना मुक्त करणे स्वामींना प्राप्तच होते.

'मीथ्या म्हणजे विघटनक्षम' या शिर्षकातंर्गत, जग स्वप्न आहे काय? असा प्रश्न उपस्थित करून ते भ्रमरूप नसून विघटनक्षम आहे. अंडज, जारज, स्वेदज, उद्‌भिज या सर्व उत्पत्तींचे व सृष्टीरचनेचे पृथ्वी आणि पाणी हे बीज आहे आणि हे मोठे नवलाचे कुतुहल आहे. 'चारी वाणी

चारी खाणी, चवऱ्यांशी लक्ष जीवयोनी' तिन्ही लोक, पिंड, ब्रम्हांड अशा रितीने जन्मास आले आहे, अष्टधा प्रवृत्ती पाण्यापासूनच जन्मल्या. असा हा सृष्टीरचनेचा विचार आहे. याचा संहार कसा होतो ते संहारणीमध्ये अत्यंत विस्तृतपणे सांगितले आहे. पण हा विनाश कल्यान्ती होतो. आणि तोपर्यंत विश्वजात टिकूनच असते, असे मात्र स्वामींना खचितच सांगायचे असते. प्रापंचिकापुढील प्रश्नांची चर्चा करताना निवृत्ती मार्गाची महती यत्किंचितही कमी करता कामा नये. त्या मार्गाने जे जातात त्यांचे ध्येय निराळे असते आणि ते सर्वश्रेष्ठ ध्येय होय. प्रपंचाचे मिथ्यात्व म्हणजे केव्हातरी होणारा नाश हा न्याय पत्करला तर प्रपंचाचे खरेपण हे मान्य केलेच पाहिजे. आणि जर तो खरा आहे तर त्याच्याकडे विधायक दृष्टीने पाहिले पाहिजे, परिस्थितीचा विचार केलाच पाहिजे. प्रयत्नवाद वाढीस लावला पाहिजे, प्रसंगी शूरपणा पत्करला पाहिजे, अन्यायाच्या प्रतिकारासाठी कमर कसली पाहिजे आणि अवश्य तर खड्ग धारण केले पाहिजे. अशी ही विचारांची परंपरा सांगितली आहे.

प्रपंचाची अवहेलना व त्याचे मिथ्यात्व यावर संत ज्ञानेश्वर, नामदेव, जनाबाई, नरहरी सोनार, चोखामेळा, सोयराबाई, एकनाथ, तुकाराम आणि शेवट रामदासांचे याविषयीचे विचार सांगितले आहेत. रामदास स्वामींचे मत मात्र भ्रमंती केल्यावर बदलले व ते म्हणू लागले,

'या कारणे गृहस्थाश्रम। सकलामध्ये उत्तमोत्तम। परंतु पाहिजे स्वधर्म। आणि भूतदया॥ सर्वांचे मूळ गृहस्थाश्रम। सकलामध्ये उत्तमोत्तम। परंतु पाहिजे स्वधर्म। आणि भूतदया॥ सर्वांचे मूळ गृहस्थाश्रम। जेथे पावती विश्राम। त्रैलोक्यवासी॥ देव ऋषी मुनी योगी। नाना तापसी वितरागी। पितृ आदिकरून विभागी। अतीत अभ्यागत॥'

आणि म्हणून 'आधी प्रपंच करावा नेटका। मग लागावे परमार्थ विवेका। प्रपंच सांडोनी परमार्थ केला। तरी अन्न मिळेना खायला। मग तया करंट्याला परमार्थ कैसा? संसार त्याग न करता। प्रपंच उपाधि न सांडता। जनामध्ये सार्थकता। विचारेंची होये।'

'आधी मेळवी मग जेवी' असा उपदेश करून ' जो प्रपंची अप्रमाण। तो परमार्थी खोटा॥ ------ गुंतल्या लोकास उगवी। शरीर कारणी लावी। व त्यासाठी आधी यत्न व तो सुद्धा अचूक असावा' हे सांगतात.

'पुढे सुखावितो। खाती जेवितो सुखी होती। यत्ने करूनी॥ अचूक यत्न करवेना। म्हणोनी केले ते सजेना॥ म्हणजे यशस्वी होईना। परंतु आपला अवगुण जाणेना। काही केल्या॥'

यत्नाचा महिमा पटविताना 'यत्नाचा लोक भाग्याचा' असे सांगून सांगोची गणती सर्वे। कर्ता कर्ता कोणी दिसेचिना॥ करंटे मिळाले सर्वे। जो तो बुधीच सांगतो॥'

आळसे शरिर पाळिले। परंतु पोटेवीण गेले
म्हणून आलस्य खोटा रे बाप्पा। आलस्य खोटा रे
धष्टपुष्ट मोठा धाटा। व्यर्थचि रे थाटा रे
आलस्य मोटा तोची करंटा। जाईल कोण्या वाटा रे
दास म्हणे रे यत्न उचारा। वैभव लुटा रे।

रामदासांच्या व तुकारामांच्या वाङ्मयातील फरक स्पष्ट करून रामदासांच्या वाङ्मयात विस्कळितपणा अथवा अलगपणा येण्याचे कारण म्हणजे हे मुख्यत: बोललेले वाङ्मय आहे; लिहिलेले वाङ्मय नव्हे. आणि हे बोलणे सुद्धा निरनिराळ्या प्रसंगी आणि स्थळी चाललेले असे.

त्यापुढे त्यांनी सांगितले आहे, दासबोधातील प्रपंच वाङ्मय हे मूळ स्वरूपात वाचताना गैरसोयीचे होईल म्हणून काही खालील शेलक्या समासांचे गद्यरूप त्यांनी दिले. उत्तम पुरुषाची लक्षणे, करंटपणाची लक्षणे, समर्थ चरित्र, कसे लिहावे इ.

'हे राजकारण होते' व 'हाही भजन संप्रदायच

काय?' या शीर्षकांखाली स्वामी राजकारणी होते यासाठी काही ओव्यांचे मर्म सांगितले आहे. स्वामींचे मन तत्वाज्ञानापासून तो सूडाच्या राजकारणापर्यंत नाना प्रकारांच्या विचारांनी केवळ गजबजून गेले होते. स्वामींना धर्मस्थापना करावयाची होती, स्वामींना समाज सावरावयाचा होता आणि स्वामींना प्रकटपणे आणि गुप्तातून राजकारणही करावयाचे होते. हे त्रिविध श्रेय स्वामींना देण्यास खळखळ करू नये.

'पहिले ते हरिकथानिरूपण - दुसरे ते राजकारण।
तिसरे सावधपण। सर्वविषयी॥

ही ओवी रामदासांच्या एकंदर धोरणाची खरीखुरी निदर्शक आहे. परंतु तरीसुद्धा स्वामींचे आंतरमन स्वतःपुरते तरी परमार्थ विचारात नेहमी मग्न असे व विसावत असे, असे श्री. माटे आवर्जून सांगतात. तपस्येने, चिंतनेने, अनुभवाने दासाचे मन समृद्ध झालं आणि गत ते म्हणाले,

धन्य कृतकृत्य झालो।
विचार घेता निवालो।
किटला रे तो संदेहो।
जाहो अथवा राहो देहो॥


किंवा वाव झाले भय सर्व संसारीचे
लाभले हरीचे निजधाम॥
निजधाम बोधे विवेके पहावे।
दास जीवेभावे सांगतसे॥

संपूर्ण दासबोध व इतर रामदासी वाङ्मय वाचून त्याचे सार वेचून काढण्याचा हा श्री. श्री. म. माटे यांचा श्री रामदास स्वामींचे प्रपंच विज्ञान हा मराठीतील अत्युत्कृष्ट प्रबंध आहे यात शंका नाही.

**श्री. अचलकुमार टिळू**
कार्याध्यक्ष, वि.प्र. मंडळ, नौपाडा, ठाणे-४०० ६०२.
दूरध्वनीः ५४२६२७०

* * *

## जजमेंट



मृत्युनंतर
एक साध्वी
नरकात गेली
अन्
एक वेश्या
स्वर्गात आली!
देवानं चित्रगुप्ताला जाब विचारला,
तसा चित्रगुप्त म्हणाला,
''माय लॉर्ड!
त्या साध्वीचा सोदा नवरा
मृत्युनंतर नरकात जाणार
अन् पतिदेवाविना स्वर्गात रूचणार नाही
म्हणून साध्वीला नरकात पाठविलं
अन् नरकवासियांना
विषयसुखाचा आनंद लाभू नये
म्हणून वेश्येला स्वर्गात आणलं!!''
देवानं चित्रगुप्ताची जजमेंट अपहेल्ड केली!!!

**प्रा. विनोद कांबळी**
वि.प्र. मंडळाची
इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, ठाणे.

* * *

# परिसर वार्ता

**सौ. आनंदीबाई केशव जोशी, इंग्रजी माध्यम शाळा स्नेहसंमेलन वृत्तांत :**

मैत्रेयी शेवडे यांनी कळवल्यानुसार -

विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणारे, त्यांच्यातील सुप्तगुण जागवणारे असे हे प्रत्येक शाळेचे स्नेहसंमेलन. विद्यार्थी वर्षभर ज्याची उत्सुकतेने वाट बघत असतात असे हे स्नेहसंमेलन.

सौ. आनंदीबाई के. जोशी, इंग्रजी माध्यम शाळेचे स्नेहसंमेलन १५, १६ व १७ डिसेंबर २००० रोजी पार पडले. दिनांक १५ डिसेंबर २००० रोजी इयत्ता ५वी व ६वी चे स्नेहसंमेलन होते. ५ वी व ६ वी च्या विद्यार्थ्यांनी मिळून ६ कार्यक्रम सादर केले. त्यातील धार्मिक एकात्मता व शास्त्रीय नृत्य या दोन कार्यक्रमांची अंतिम दिवसासाठी निवड करण्यात आली.



डॉ. विजया मूर्ती

पहिल्या दिवसासाठी डॉ. विजया मूर्ती, शीव येथील SIES- ECCEd College च्या संचालिका ह्या प्रमुख पाहुण्या म्हणून लाभल्या होत्या. त्यांनी, मुलांना समजून घेऊन पालकांनी त्यांच्याशी संवाद साधावा असे सांगितले. बाकी काहीही होण्यापेक्षा आदर्श पालक होणे हे फार कठीण आहे. मुलांच्या उत्कर्षासाठी पालकांनी हे आव्हान पेलावे असे त्या म्हणाल्या. पारितोषिक विद्यार्थ्यांना त्यांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली.

दिनांक १६ डिसेंबर २००० रोजी इ. ७ वी व ८वी चे स्नेहसंमेलन झाले. त्या दिवसासाठी डॉ. सविता भट, मुलुंड कॉमर्स कॉलेजच्या, इंग्रजी विभाग प्रमुख या पाहुण्या म्हणून लाभल्या होत्या. त्यांनी थेट मुलांशीच संवाद साधला व हसत खेळत मुलांना खेळाबरोबरच अभ्यास करणे हे महत्त्वाचे आहे असे सांगितले. त्यांच्या हस्ते प्रत्येक विषयातील व वर्गातील पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यात आली.



पु.ल. देशपांडे लिखित 'म्हैस' या नाटिकेतील दृश्य. सादरकर्ते इ. ८वी व इ. ९वी चे विद्यार्थी.

निसर्गावर तुम्हाला प्रभुत्व हवे असल्यास निसर्गाचे नियम नीट पाळलेच पाहिजेत.

त्या दिवशीच्या ६ कार्यक्रमांपैकी मराठी व हिंदी नाटकाची अंतिम दिवसासाठी निवड करण्यात आली.



**विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा. डॉ. वा. ना. बेडेकर, प्रमुख पाहुण्या डॉ. सौ. सई देशपांडे व मुख्याध्यापिका सौ. कालिंदी कोल्हटकर.**

दिनांक १७ डिसेंबर २००० रोजी ९ वी व १० वी चे स्नेहसंमेलन झाले. डॉ. सई देशपांडे, एस्.एन्.डी.टी. कॉलेजच्या मराठी विभाग प्रमुख, ह्यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषविले. विद्यार्थी जीवनातील मेहनतीचे महत्व त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यात आली. 'सौ. आनंदीबाई जोशी मेडल' या प्रतिष्ठेच्या पदकाचे ५ वी ते ७ वी या गटात स्वप्नील चुबे व ८ वी ते १० वी या गटात मानसी थापट हे मानकरी ठरले. आदर्श शिक्षक पारितोषिक सौ. मनीषा साळी व श्री. अशोक आहेर यांना मिळाले. विद्या प्रसारक मंडळातर्फे दिले जाणारे 'कै. श्रीमती सुमतीबाई टिल्लू' आदर्श शिक्षक पारितोषिक रु.२०१/- सौ. अपर्णा भोळे यांना मिळाले. शाळेच्या मुख्याध्यापिका कालिंदी कोल्हटकर यांनी अहवाल वाचन केले. ९ वी च्या विद्यार्थ्यांनी करमणुकीचे कार्यक्रम सादर केले. आधीच्या दोन दिवसातील निवडलेले कार्यक्रम व अंतिम दिवसाचे कार्यक्रम ह्यातून प्रथम, द्वितीय व तृतीय पारितोषिक दिले गेले.

मंडळाचे अध्यक्ष डॉ. वा. ना. बेडेकर, उपाध्यक्ष श्री. करंदीकर, कार्याध्यक्ष श्री. टिल्लू, इतर सदस्य यांच्या उपस्थितीने तसेच मुख्याध्यापिका सौ. कालिंदी कोल्हटकर यांच्या सुयोग्य मार्गदर्शनाने व विद्यार्थी-शिक्षक यांच्या मेहनतीने तिन्ही दिवसांचे कार्यक्रम उत्तमरित्या पार पडले.

दिनांक २१.२२.२३ डिसेंबर रोजी विद्यार्थ्यांना अल्पोपहार देण्यात आला. दिनांक २० डिसेंबर रोजी आनंद मेळा आयोजित करण्यात आला होता. त्यात खेळांचे व खाण्याच्या पदार्थांचे स्टॉल लावून विद्यार्थ्यांनी उत्साहाने भाग घेतला.

इ. १० वी च्या परीक्षेत मुंबई बोर्डातून प्रथम येण्याचा मान मिळवणारा शाळेचा विद्यार्थी नचिकेत थोरात याचा त्याच्या पालकांसह स्नेहसंमेलनाच्या दिवशी सत्कार करण्यात आला. तसेच B.Com च्या परीक्षेत मुंबई विद्यापीठातून प्रथम येणारी अनिता साठे ही याच शाळेची माजी विद्यार्थिनी असल्यामुळे तिचाही सत्कार करण्यात आला.

**सौ. ए.के.जोशी इं. मि. स्कूल - पूर्व प्राथमिक विभाग**



**सौ. ए.के.जोशी इं. मि. स्नेह संमेलन -छोट्या शिशुंचे 'किसान नृत्य'.**



सौ. ए.के.जोशी इं. मि. स्कूल सँटा क्लॉज बरोबर नाताळ साजरा करत आहेत - शिशु वर्गांची मुले.

दिनांक २२ डिसेंबर रोजी शाळेत नाताळ साजरा करण्यात आला. पारंपरिक 'ख्रिसमस ट्री' व 'येशू जन्माचा देखावा' तयार करून पूर्ण शाळा सजवण्यात आली होती. सँटाक्लॉज झालेल्या ऋषभ ठक्कर व मिहिरा देवधर यांनी मुलांना चॉकलेटस् व मुखवटे वाटले. या दिवशी मुलांना गोड शिरा व ढोकळा यांचा अल्पोपहार देण्यात आला.

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर - पूर्व प्राथमिक विभाग

सौ. सुलक्षणा पाध्ये यांनी कळवल्यानुसार -

दरवर्षाप्रमाणे यंदाही पूर्व प्राथमिक विभागाचे स्नेहसंमेलन १९ डिसेंबर २००० रोजी पार पडले. या कार्यक्रमाची पाहुणी होती, 'आभाळमाया फेम' स्वरांगी मराठे उर्फ चिंगी.

सौ. अंजली पटवर्धन या शिक्षिकेने स्वरचित ईशस्तवन व स्वागतगीत मुलांच्या माध्यमातून सादर केले. यावेळचे वैशिष्ट्य म्हणजे तिरंगी झेंड्याप्रमाणे या मुलांचा पोशाख होता व भारतमाताही उभी होती. त्यामुळे एक वेगळेपण दिसत होते.



स्वरांगी मराठे

या कार्यक्रमाची प्रमुख पाहुणी लहान असल्याने तिच्या भाषणाऐवजी व्यासपीठावर तिची प्रत्यक्ष मुलाखतच अक्षय नेने व ऋतुजा चंद्रराव या मोठ्या शिशुच्या दोन मुलांनी घेतली. हा आगळावेगळा कार्यक्रम सर्वांनाच भावला होता.



डॉ. वा. ना. बेडेकर भाषण करताना.

स्नेहसंमेलनाच्या या कार्यक्रमासाठी यावर्षी गीताचे विविध प्रकार क्रमाक्रमाने सादर केले.

सर्वप्रथम भूपाळी हा गीतप्रकार सादर केला. खेड्यामध्ये पहाटेच्या वेळी जसे वातावरण असते, तसेच या भूपाळीत दाखवले होते.

त्यानंतर ओवी हा गीतप्रकार होता. विविध प्रकारच्या ओव्या, म्हणजे जात्या वरच्या, बाळाला भरवताना, झोपवताना, बारसे, लग्न, मुंज, नववधू सासरची माणसं कशी वागतात हे माहेरी सगळ्यांना ओव्यातून सांगतेय, अशा या ओव्या स्थिरचित्राच्या माध्यमातून दाखवल्या.

तिसरा प्रकार म्हणजे देवाचे स्तवन व देवाला आव्हाण असा हा जागर गीतप्रकार खूपच छान झाला. पाच रंगांची उधळण करणाऱ्या गवळणी व त्यांच्याबरोबर रासक्रीडा करणारा कृष्ण अशी ही गवळणी खूपच सुरेख झाली.

आषाढी व कार्तिकी एकादशीला पंढरपूरला जाणारी छोट्या वारकऱ्यांची दिंडी प्रत्यक्ष पालखी, भगव्या पताका घेऊन, टाळ-मृदुंगाच्या गजरात सादर केली. भजन म्हटले की बसून करायचे असा एक समज आहे. पण हे भजनीमंडळ नृत्याच्या रूपात भजन करीत होते. कृष्णही राधेबरोबर प्रगट होऊन या भजनात सामील झाला होता.

भारूड म्हटले की एकनाथ महाराज आठवतात. विडंबनात्मक काव्य असा हा भारूड प्रकार असतो. शाळेचं महत्त्व यातून मुलांना सांगितलं होतं.

त्यानंतर शूर वीर व शूर वीरांगना यांची महिती पद्यातून सांगणारा गीतप्रकार सादर केला गेला पोवाड्याच्या माध्यमातून. ह्यानंतरचा पंजाबी ढंगातील कव्वाली हा गीतप्रकार होता. मात्र या कव्वालीत सवाल-जवाब नव्हते बरं का!

आणि सर्वात शेवटी आपल्या भारत देशाचं यथार्थ वर्णन असणारे देशभक्तीपर गीत सादर केलं.

स्नेहसंमेलनात मनोरंजनाचे असे विविध दहा गीतप्रकार सादर करण्यात आले.

सर्वच कार्यक्रम उत्तम झाले. विभाग प्रमुख सौ. वैद्य बाई तसेच सेविका यांचे मोलाचे सहकार्य, शिक्षकांची अपार मेहनत व विद्यार्थ्यांची उत्तम साथ या कार्यक्रमातून जाणवत होती.

शेवंती गटातील लहान व मोठा शिशु या वर्गांच्या अनुक्रमे सौ. केतकी अंबिके व सौ. नेहा जोगळेकर या दोन शिक्षिकांना उत्तम संयोजनाचे पारितोषिक मिळाले. तसेच यंदाचा उत्तम सेविकेचा पुरस्कार सौ. वंदना पवार यांना देण्यात आला.

कुमार कला केंद्रातर्फे घेण्यात आलेल्या लोकनृत्य स्पर्धेत 'नमन' या लोकनृत्याला उत्तेजनार्थ बक्षिस मिळाले. याचे नृत्य दिग्दर्शन नेहा जोगळेकर व पूर्वा खरे यांनी केले होते. ब्राह्मण सेवा संघातर्फे घेण्यात आलेल्या धार्मिक पाठांतर स्पर्धेत लहान शिशुच्या स्वप्नील वसंत दळवी याला पारितोषिक मिळाले. संस्कृती कला-दर्पण तर्फे घेण्यात आलेल्या लोकनृत्य स्पर्धेत 'जागर' या लोकनृत्याला प्रथम पुरस्कार मिळाला. अमर विकास थोरात व स्नेहा शंकर गावकर या विद्यार्थ्यांचा यात सहभाग होता.

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर - माध्यमिक विभाग

**कु. प्रचिता प्रकाश पाटणकर (ॲथलेटिक्स् -१४ वर्षे वयोगट मुली)**

१) महाराष्ट्र राज्य ॲथलेटिक्स् ॲमेच्युअर तर्फे I.T.C. पुरस्कृत जिल्हास्तरीय स्पर्धेत प्रियदर्शनी पार्क येथे झालेल्या जिल्हा स्तरीय स्पर्धेत PENTATHLON ह्या क्रीडा प्रकारात प्रथम आली. आणि तिची जळगांव येथे ७ व ८ ऑक्टोबर २००० रोजी राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली होती. त्यानंतर १९ ऑक्टोबरला व २० आक्टोबरला जबलपूर येथे विभागीय स्पर्धा होऊन तिची हरियाना येथे राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली.



कु. प्रचिता प्रकाश पाटणकर

२) **आंतरशालेय स्पर्धा** : २७ व २८ सप्टेंबर रोजी प्रियदर्शनी पार्क मुंबई येथे तालुका पातळी झाली त्यात उंच उडी व लांब उडी प्रथम क्रमांक. ३ व ४ ऑक्टोबर रोजी प्रियदर्शनी पार्क मुंबई येथे जिल्हा स्तरीय स्पर्धेत लांब उडी व उंच उडी प्रथम क्रमांक ३ ते ४ नोव्हेंबर रोजी नाशिक येथे झालेल्या राज्यस्तरीय स्पर्धेत उंच उडी व लांब उडीत द्वितीय क्रमांक. ६ ते ९ नोव्हेंबर रोजी. प्रवरानगर (अहमदनगर) येथे झालेल्या विभागिय स्तरावर उंच उडी व लांब उडीत द्वितीय क्रमांक. ८ ते १२ जानेवारी २००१ रोजी. गांधीनगर (गुजराथ) येथे झालेल्या राष्ट्रीय स्तरावर तिने महाराष्ट्राचे प्रतिनिधीत्व केले. तेथे उंच उडी व लांब उडीत चौथ्या क्रमांकावर होती.

३) ठाणे डिस्ट्रीक्ट अॅमेच्युअर अॅथलेटिक्स् असोसिएशन तर्फे दिनांक १६ ते १७ डिसेंबर रोजी ठाणे येथे झालेल्या जिल्हास्तरीय स्पर्धेत PENTATHLON ह्या क्रीडा प्रकारात प्रथम क्रमांक मिळवून ५ ते ६ जानेवारी २००१ येथे झालेल्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी ठाणे जिल्ह्याचे प्रतिनिधित्व केले. तसेच १६ ते १७ डिसेंबर २००० रोजी ठाणे येथे झालेल्या जिल्हा स्तरीय स्पर्धेत उंच उडीत द्वितीय व लांब उडीत प्रथम क्रमांक मिळविला. आणि ह्या वर्षीची ठाणे जिल्ह्याची मुलींची १४ वर्षांच्या गटाची वैयक्तिक चॅम्पियनशिप मिळविली.

आता ३ ते ५ फेब्रुवारी २००१ रोजी नागपूर येथे होणाऱ्या राज्य स्तरीय स्पर्धेसाठी खेळणार आहे.

४) रायन इंटरनॅशनल स्पोर्ट क्लब तर्फे व नेसले मायलो पुरस्कृत दिनांक ४ डिसेंबर २००० रोजी युनिव्हर्सिटी ग्राउन्ड, मुंबई येथे झालेल्या राज्य स्तरीय स्पर्धेत उंच उडी व लांब उडी द्वितीय क्रमांक मिळवून रौप्य पदक मिळवीले. तसेच मुलींच्या १६ वर्षांच्या गटात भाग घेऊन त्या गटाला ४ x १०० मीटर व ४ x ४०० मीटर रिले रेस मध्ये प्रथम क्रमांक मिळवून दिला व सुवर्ण पदक पटकाविले.

५) The BOMBAY YMCA तर्फे दिनांक १४ जानेवारी रोजी युनिव्हर्सिटी ग्राउन्ड, मुंबई येथे राज्य स्तरीय स्पर्धेत लांब उडी प्रथम क्रमांक मिळवून सुवर्ण पदक मिळवीले.

**सौ. आनंदीबाई केशव जोशी, इंग्रजी प्राथमिक शाळा स्नेहसंमेलन वृत्तांत :**

सौ. शैला सांगोली यांनी कळवल्यानुसार -

सौ. आनंदीबाई केशव जोशी, इंग्रजी मिडीयम स्कूलच्या प्राथमिक विभागाचे स्नेहसंमेलन १६ डिसेंबर रोजी आयोजित करण्यात आले होते. प्रमुख पाहुणे म्हणून ठाणे वैभवचे संपादक श्री. मिलिंद बल्लाळ यांना आमंत्रित करण्यात आले होते. श्री. मिलिंद बल्लाळांसारख्या अष्टपैलू व्यक्तिमत्व असलेल्या व्यक्तीच्या उपस्थितीमुळे या कार्यक्रमाला फारच शोभा आली. त्यांच्या सामाजिक कार्यांची माहिती मुख्याध्यापिका बेलींडा डिसुझा यांनी करुन दिली. आपल्या अध्यक्षीय भाषणात श्री. बल्लाळ यांनी मुलांना आपला वाचनाचा व्यासंग वाढवण्याचा संदेश दिला. त्यांनी असेही म्हटले की, केवळ पाठांतर करुन परीक्षार्थी होण्यापेक्षा विद्यार्थ्यांनी वाचन, मनन चिंतन करुन आपल्या कक्षा वाढविल्या पाहिजेत. भाषण व पारितोषिक समारंभानंतर विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला. पहिली ते चौथीच्या मुलांच्या या कार्यक्रमात खूपच विविधता होती.

गरीबांना दुःख अनुभवाने कळते, पण श्रीमंतांना बुद्धीने ते जाणून घ्यावे लागते.



सौ. ए.के. जोशी इं. मि. स्कूल -प्राथमिक विभागाच्या स्नेह संमेलनाची कार्यक्रम पत्रिका पाहताना प्रमुख पाहुणे श्री. मिलिंद वल्लाळ व इतर पदाधिकारी



सौ. ए.के. जोशी इं. मि. स्कूल -प्राथमिक विभाग इंग्लीश डान्स

**इंग्लीश डान्स :** देशभक्तीपूर्ण गाण्यावर आधारीत डान्स, तसेच हिंदी गोष्टीवर आधारित डान्स, मराठी लोक-संगीतावर आधारित कार्यक्रम, सिंड्रेलाची परिकथा, तबला व बोलपटावर आधारित क्लासीकल डान्स असे सुंदर कार्यक्रम मुलांनी सादर केले. कार्यक्रम पाहताना शिक्षकांनी घेतलेल्या परीश्रमांची जाणीव होत होती. कार्यक्रमामधून विद्यार्थ्यांना मौलिक शिक्षण मिळेल याची काळजी शिक्षकांनी घेतली होती.



सौ. ए.के. जोशी इं. मि. स्कूल -प्राथमिक विभाग महाराष्ट्राची लोकधारा

| | | |
|---|---|---|
| Best Boy - | Sanket Khambete | 4th B |
| Best Girl- | Riddhi Shah | 4th A |

Roshan Patel Trophy for

Best Student Nikita Kalghataji 4th A

Items

| | |
|---|---|
| 1) English Dance<br>2) हिंदी डान्स<br>(ये देश है वीर जवानोंका) | 1st |
| 1) प्रेमसे हमे जीने दो<br>2) Formation on Music | 2nd |
| 1) Cindrella<br>2) दुल्हन चली ओरे बहन चली | 3rd |
| 1) Classical Dance on Shankar Mahadevan Zakir Husain — ताल जुगल बंदी | 4th<br>4th |
| 2) महाराष्ट्राचे लोकसंगीत | |

**डॉ. वेडेकर विद्या मंदिर - प्राथमिक विभाग**

सौ. विनोदिनी राणे यांनी कळवल्यानुसार-

डॉ. वेडेकर विद्या मंदिर - प्राथमिक विभागचे 'वार्षिक स्नेहसंमेलन' व 'पारितोषिक वितरण समारंभ'

सोमवार दिनांक १८ डिसेंबर २००० रोजी संस्थेच्या 'विद्यालंकार' सभागृहात आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून बेडेकर-जोशी महाविद्यालयाचे माजी प्राध्यापक श्री. विनोद गोपाळ नंद हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. वा.ना. बेडेकर यांनी भूषविले. या कार्यक्रमास विद्या प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष श्री.श्री. वि. करंदीकर, कार्याध्यक्ष श्री. अ.धो. टिल्लू, सभासद श्री. ल.ग. देव व श्री. वि. ना. मराठे, पूर्व प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. विदुला वैद्य इत्यादी मान्यवर उपस्थित होते.



**डॉ. बेडेकर प्राथमिक विभाग, मुख्याध्यापिका श्रीमती मळेकर यांचे प्रास्ताविक. व्यासपीठावर डॉ. वा. ना. बेडेकर, श्री. करंदीकर, प्रमुख पाहुणे श्री. विनोद नंद (मध्यभागी),श्री. टिल्लू, श्री. देव व सौ. वैद्य**

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रा. श्री. विनोद नंद यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. आपल्या भाषणातून त्यांनी शाळेच्या प्रगती बद्दल प्रशंसा केली. मी या मंडळाच्या परिवारातील एक सदस्य आहे व मला अशा कार्यक्रमांना उपस्थित रहाण्यास आवडते असे सांगून शाळेच्या उत्तरोत्तर प्रगतीसाठी शुभेच्छा दिल्या. तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. वा. ना. बेडेकर यांनी शाळेतील विद्यार्थ्यांबरोबरच त्यांना घडवणाऱ्या सर्व शिक्षकांचे अभिनंदन केले.

या नंतर सन १९९९-२००० या शैक्षणिक वर्षांत शालेय अभ्यासक्रमात विशेष प्रावीण्य मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुणे व अध्यक्षांच्या हस्ते बक्षीसे देऊन गौरविण्यात आले. शाळेतील इयत्ता ४थी ची विद्यार्थीनी कु. स्वप्नाली सावंत हीस आदर्श विद्यार्थिनी म्हणून गौरविण्यात आले.



**लावणी नृत्य**

पारितोषिक वितरण समारंभानंतर प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांनी 'महाराष्ट्राची लोकधारा' हा सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला. कार्यक्रमामध्ये मनोरंजना बरोबरच महाराष्ट्रातील विविध जमातीचे लोकजीवन व त्यांचे व्यवसाय याबद्दल ओळख करून देण्यात आली. याबरोबरच महाराष्ट्रात विविधतेतही एकता कायम आहे हे दाखविणारा पोवाडा सादर करण्यात आला. पशुपक्षांमधील एकतेवर आधारित 'आम्ही सारे एक' हे नाटक सादर करून कार्यक्रमाची सांगता झाली.

सांस्कृतिक विभागातील कार्यक्रमांचे परीक्षण करण्यासाठी माध्यमिक विभागातील शिक्षिका सौ. लिमये बाई व सौ. आशा जोशी ह्या उपस्थित होत्या. त्यांनी कार्यक्रमातील सर्व सहभागी विद्यार्थ्यांचे त्यांनी दाखविलेल्या कलागुणांबद्दल कौतुक केले.

स्नेहसंमेलना निमित्त विविध क्रीडा स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. त्याचा पारितोषिक वितरण समारंभ मंगळवार दिनांक १९ डिसेंबर २००० रोजी शाळेच्या वेळेतच साजरा करण्यात आला. सकाळ विभागातील विजयी विद्यार्थ्यांना शाळेच्या माजी मुख्याध्यापिका सौ. दांडेकर यांच्या हस्ते बक्षिसे देण्यात आली. तसेच दुपार विभागातील विजयी विद्यार्थ्यांना माजी मुख्याध्यापिका सौ. महाडीक यांच्या हस्ते बक्षिसे देण्यात आली. कार्यक्रमात उपस्थित प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांना अभ्यासाबरोबरच खेळाचे, व्यायामाचे व आहाराचे महत्त्व पटवून दिले.

स्नेहसंमेलना निमित्त बुधवार दिनांक ३ जानेवारी २००१ रोजी प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांना 'अल्पोपहार' देण्यात येऊन वार्षिक स्नेहसंमेलनाच्या कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## V.P.M. Institute of Management Studies

विद्या प्रसारक मंडळामार्फत भूपाळी ते भैरवी या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन दि. ६ जानेवारी २००१ रोजी रात्री ८.३० वाजता गडकरी रंगायतन येथे करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात मंडळाचे अध्यक्ष डॉ. वा.ना. बेडेकर यांनी केलेल्या प्रास्ताविक भाषणाने झाली. त्यामध्ये त्यांनी कार्यक्रमाचा उद्देश स्पष्ट करताना सांगितले की विद्या प्रसारक मंडळाने व्यवस्थापन अभ्यासक्रमास महत्त्व देऊन व्यवस्थापन संस्थेचा विकास करण्याचा उद्देश आहे. संस्थेसाठी लागणारी इमारत व A.I.C.T.E. च्या अटी महागड्या असल्या तरी विद्या प्रसारक मंडळ त्या पूर्ण करील असा विश्वास त्यांनी प्रगट केला. सध्या V.P.M. Institute of Management Studies ने सुरु केलेला पूर्णवेळ P.G.D.B.M. हा अभ्यासक्रम नुकसानात सुरु असल्या कारणाने हे नुकसान भरून काढण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे तसेच यापुढे आणखी मोठ्या




विद्या प्रसारक मंडळ ठाणे. शैक्षणिक निधीसाठी संगीताचा कार्यक्रम

कार्यक्रमाचे आयोजन करून अद्ययावत् व्यवस्थापन संस्था सुरु करण्याचे ध्येय आम्ही ठेवले आहे व त्यालाही ठाणेकर चांगलीच साथ देतील अशी आशाही त्यांनी व्यक्त केली. या कार्यक्रमासाठी सर्व संस्थांनी केलेल्या सहकार्याबद्दल सर्व संस्थांचे त्यांनी आभार मानले.




श्री. गुंगारे यांचा सत्कार करताना मंडळाचे उपाध्यक्ष श्री. कारंदीकर

या नंतर श्री. सचिन करंदळेकर यांनी आपल्या साथीदारांसह आपल्या विविध रंगी कार्यक्रमाला सुरुवात केली. भूपाळी, ओवी, गण, गवळण, भावगीत, भक्तीगीत, नाट्यसंगीत असे अनेक गीत प्रकार सादर करतानाच या गीत प्रकारांची वैशिष्ट्ये व माहितीही

थोडक्यात सांगून कार्यक्रमाला रंगत आणली. या नंतर हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी स्वतःला झोकून देऊन ज्यांनी मेहनत घेतली त्या बद्दल श्री. तुंगारे यांची मंडळाचे उपाध्यक्ष श्री. करंदीकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. संस्थेचे कार्याध्यक्ष श्री. टिळू यांनी केलेल्या आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## तंत्रनिकेतन

२३ व २४ नोव्हेंबर २००० महाराष्ट्र तंत्रशिक्षण परीक्षा मंडळाचे चेअरमनच्या पुढाकाराने एक कार्यक्रम आयोजित केला होता. विषय होता ''मॅनेजिंग इनोव्हेशन इन टेक्निकल एज्युकेशन सिस्टिम'' ही कार्यशाळा दोन दिवस बांद्रा येथे होती.

या कार्यशाळे करिता महाराष्ट्रातील ३७ तंत्रनिकेतनाच्या प्राचार्यांना पाचारण करण्यात आले होते. २८ जण सरकारी व सरकारी अनुदानित संस्थामधील होते. व १० प्राचार्य विनाअनुदान तंत्रनिकेतनातील होते. यापैकी आपल्या विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनातील प्राचार्य श्री. मुजुमदार हे हजर होते.

खाली दिलेले वेगवेगळे उपक्रम या तंत्रनिकेतनांना देण्याची संचालकांची योजना आहे.

१) अभ्यासक्रम आराखडा (design)
२) लर्निंग रिसोर्स डेव्हलपमेंट
३) इन्स्ट्रक्शनल डिझाइन
४) फिल्ड टेस्टिंग ऑफ लर्निंग रिसोर्स
५) लर्निंग रिसोर्स युटिलायझेशन
६) सॉफ्ट स्किल ॲसेसमेंट आणि डेव्हलपमेंट
७) डेव्हलपमेंट ऑफ केश्चन बँक

या पैकी आपल्या तंत्रनिकेतनात केमिकल इंजिनिअरिंग या पदविकेचे नवीन अभ्यासक्रम पुनर्रचना करण्याचे काम आधीच दिलेले आहे.

ISTF तर्फे २ डिसेंबर २००० रोजी सौ. सुहास जोशी यांचे व्याख्यान झाले. विषय होता ''घनकचरा व त्याचे व्यवस्थापन''. सौ. सुहास जोशी एक अभिनेत्री असूनही या विषयावर त्या खुमासदार पद्धतीने बोलल्या. विषय वेगळा व थोडा रुक्ष असूनही त्यांची बोलण्याची हातोटी विषय समजण्याजोगा असल्याने हे व्याख्यान बोधपूर्ण झाले.



सौ. सुहास जोशी

त्यांनी या विषयावरील आपले विचार वैज्ञानिक दृष्टिकोणातून मांडले. टाकाऊ वस्तूपासून स्वस्त इंधन कसे मिळेल याबद्दल त्या बोलल्या. तसेच स्वस्त वीजही हाऊसिंग सोसायट्यांसाठी टाकाऊ कचऱ्यापासून बनविता येऊ शकेल व या पासून इतरांना रोजगारही मिळण्याची शक्यता असते.

इंधन, वीज जर टाकाऊ कचऱ्यापासून मिळत असेल तर आपण का मिळवायची नाही ? ही मोहीम यशस्वी होण्यासाठी सर्वांचा सहभाग आवश्यक आहेच तसेच जागरुकताही या साठी आवश्यक आहे. असे ही त्या म्हणाल्या. या नंतर प्रेक्षकांची प्रश्नोत्तरे या संबंधी झाली. यात विद्यार्थ्यांनीही भाग घेतला होता.

या कार्यक्रमाची प्रस्तावना प्रा. सौ. गीताली इंगवले व प्रा. वालावलकर यांनी केली होती. प्राचार्य श्री. मुजुमदार यांनीही सौ. सुहास जोशी यांचे वेगळा विषय मांडला या बद्दल आभार मानले.

४ डिसेंबर ते ८ डिसेंबर २००० आमच्या पदविका तंत्रनिकेतनाच्या दृक्-श्राव्य सभागृहात, केमिकल इंजिनिअरिंगच्या अभ्यासक्रमाची पुनर्रचना करण्यासाठी वेगवेगळ्या तंत्रनिकेतनातून प्राचार्य तसेच प्राध्यापक आले होते. यावेळी १४-१५ वेगवेगळ्या तंत्रनिकेतनातून आलेले हे सर्व त्या त्या विषयात पारंगत होते. त्यांनी एकमेकांशी चर्चा करून अभ्यासक्रमात काय काय बदल करता येईल याचा एक आराखडा तयार केला. ग्रंथालयातून काही पुस्तके संदर्भासाठी घेऊन, विषयवार अभ्यासकरून त्यावर चर्चा करून त्यांनी या पुनर्रचित अभ्यासक्रमावर काम केले. यात खाली दिल्याप्रमाणे त्या सर्वांचा सहभाग होता.

सौ. अंजू रावले - टी.टी. आय. भोपाळ, या फॅकल्टी ॲडव्हाइजर म्हणून सहभागी होत्या. विद्या प्रसारक मंडळाचे प्राचार्य श्री. मुजुमदार, पिंपरी चिंचवड तंत्रनिकेतनाचे प्राचार्य श्री. डी. एन्. देशमुख, पिंपरी-चिंचवड तंत्रनिकेतनातील प्राध्यापक श्री. देशपांडे, भारती विद्यापीठ पुणे येथून श्री. कुलकर्णी व श्री. होणे, भारती विद्यापीठ मुंबई येथून सौ. सि. सी. शाजी (विभाग प्रमुख), तसेच दीपा पी. वरळी येथील B.I.T. सौ. इ.वी. जोसेफ, विद्या प्रसारक मंडळ तंत्रनिकेतनातून, श्री. ओक (विभाग प्रमुख), तसेच मिस् प्रभू, जोंधळे तंत्रनिकेतनातून, सौ. जी. जे. देशमुख (विभाग प्रमुख), श्री. नवले, श्रीराम तंत्रनिकेतन यामधून हे ही होते. बोर्ड ऑफ टेक्निकल चे एक मेंबर श्री. महाशब्दे हे यावेळी उपस्थित होते. दुसरा भाग जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात होणार आहे.

यात विशेष म्हणजे या अभ्यासक्रमाच्या पुर्नरचनेसाठी आपले विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन हे एक सेंटर ठरविले आहे. या नंतर लर्निंग मटेरिअल पदविका केमिकल इंजिनिअरिंग साठी तयार करण्याचा या सर्वांचा मनोदय आहे.

आपल्या तंत्रनिकेतनाला आणखी एक अभिमानाची गोष्ट म्हणजे प्रेषक भारतीय प्रौद्योगिक संस्थान, मुंबई पवई, यांच्या IIT तर्फे (इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, मुंबई, पवई) Jee च्या परीक्षा झाल्या. या संस्थेकडून आपल्याकडे परीक्षा घेण्याची विचारणा झाली होती. या नंतर विद्या प्रसारक मंडळानेही या साठी परवानगी दिली. जॉईंट एन्ट्रन्स एक्झामिनेशन २००१ या साठी या परीक्षा होत्या.

या परीक्षेच्या वेळी प्राचार्य श्री. मुजुमदार व उपप्राचार्य श्री. नायक यांनी जातीने लक्ष घालून या परीक्षेच्यासाठी सुसूत्रता आणली. पर्यवेक्षक म्हणून तंत्रनिकेतनाचा काही शिक्षक स्टाफ निवडला होता. सौ. चाफेकर यांनी एकंदर परीक्षा पद्धतीचे काम पाहिले. तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनीही या बाबत काम केले. त्यांचेही दोन प्रतिनिधी या वेळी उपस्थित होते. प्रा. एम्. पी. दिक्षीत व श्री. के.व्ही. जॉय. एकंदर २०० विद्यार्थी या परीक्षेसाठी उपस्थित होते. ही परीक्षा १० डिसेंबर २००० रोजी सकाळी १० ते १ या वेळात होती.

### तंत्रनिकेतन 'पॉलि-स्पार्क'

सौरभ देशपांडे यांनी दिलेल्या वृत्तांतानुसार विद्याप्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनातील यंदाचा वार्षिक स्नेहसंमेलनाचा व इतर कार्यक्रमांचा सोहोळा अत्यंत रंगतदारपणे आणि दिमाखात पार पडला. या वर्षीच्या सोहळ्याचे वैशिष्ट्य म्हणजे नामकरण सोहळा. या वर्षापासून आपल्या वार्षिक संमेलनाचे नामकरण 'Poly-spark' असे करण्यात आले आहे.

---

माणसाने माणसाचा द्वेश करणे हे सर्वात मोठे पाप आहे.-संत एकनाथ महाराज

यंदाच्या वर्षी २६ डिसेंबर ते ३० डिसेंबर या कालावधीत विविध कार्यक्रम सादर करण्यात आले. २६ डिसेंबर रोजी रांगोळी व मेंदी स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. यानंतर आनंद मेळ्यास भरभरून वाहणाऱ्या उत्साहात सर्व विद्यार्थी व स्टाफ खेळांचा व खाद्यपदार्थांचा आस्वाद घेत रंगून गेले होते.



श्री. संजय उपाध्ये यांचे स्वागत करताना वि.प्र. मंडळाचे अध्यक्ष डॉ. वा. ना. बेडेकर

दि. २७ डिसेंबर रोजी सदर सोहळ्याचे नामकरण अत्यंत दिमाखात पार पडले. या दिवशी श्री. संजय उपाध्ये यांच्या 'गप्पाष्टक' या कार्यक्रमाने विद्यार्थ्यांना एका वेगळ्याच कार्यक्रमाचा अनुभव मिळाला. काव्य, वाङ्मय, राजकारण इ. विषयांवर त्यांनी हसतखेळत विद्यार्थ्यांशी सुसंवाद साधला. त्यांनी स्थापन केलेल्या 'कलकी' या संघटनेचे सदस्य होण्यास मुलांना त्यांनी आवाहन केले.

श्री. संजय उपाध्ये यांनी आपल्या सुरेख व रसाळ विवेचनातून वर्तमान परिस्थितीचा घेतलेला आढावा, आपल्या समाजाचा होत असलेला ऱ्हास यावर अत्यंत उद्‌बोधक असे विचार मांडून युवकांना एका वेगळ्याच वैचारिक पातळीवर नेऊन विचार करण्यास प्रवृत्त केले. या कार्यक्रमास विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. वा. ना.



विद्या प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष श्री. करंदीकर, कार्याध्यक्ष श्री. टिल्लू, प्राचार्य श्री. मुजुमदार, उपप्राचार्य श्री. नायक, पार्लिस्पार्क मधील 'गप्पाष्टक' बघताना.

बेडेकर, उपाध्यक्ष श्री. करंदीकर व कार्याध्यक्ष श्री. टिल्लू उपस्थित होते. यानंतर एक कार्यक्रम ज्यावद्दल सर्वच विद्यार्थीवर्ग उत्सुक असतात तो Tie King & Saree Queen. ह्यात टायकिंग म्हणून विनय दुवल व सारी क्वीन म्हणून प्रियांका यांची निवड झाली. One Minute Show ह्या कार्यक्रमासही विद्यार्थ्यांचा खूप प्रतिसाद होता.

श्री. गोपाळ बोधे यांच्या छायाचित्रणाच्या स्लाईड शो ने २८ डिसेंबर रोजी सुरुवात झाली. महत्‌प्रयासाने केलेले सुंदर छायाचित्रण व विलोभनीय पृथ्वीदर्शन हे अत्यंत उत्कृष्ट होते. Arial Photography ने त्यांनी हे छायाचित्रण केल्याने ते विशेष उल्लेखनीय वाटले. त्यांनी स्वतः त्याची माहिती, आलेल्या अडचणी, त्यावर केलेली मात व इतरही माहिती स्लाईड शो दाखविताना सांगितली. यानंतर अंताक्षरी हा कार्यक्रमही झाला. यात प्रथमच 'Visual Round' सादर करण्यात आली होती.



श्री. गोपाळ योधे यांचे स्वागत करताना सौ. वडेर (इ.पी.एस्. विभाग प्रमुख)

दि. २१ डिसेंबर रोजी गायनस्पर्धा झाली. यात अभिषेक पाळंदे हा प्रथम विजेता ठरला. याच दिवशी एकांकिका आणि एकपात्री प्रयोग सादर केले. यात 'वाऱ्यावरची वरात' संकेत देशपांडे व इतर यांनी सादर केले व प्रथम पारितोषिक मिळविले.

या दिवसाचे वैशिष्ट्य म्हणजे 'कौन बनेगा ज्ञानपती' हा विद्यार्थ्यांनी तयार केलेला एक अनोखा कार्यक्रम. 'कौन बनेगा करोडपती'च्या धर्तीवर तयार केलेल्या ह्या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त भाग घेऊन हा कार्यक्रम यशस्वी केला. सांस्कृतिक कार्यक्रमाचे सर्व कमिटी मेंबर व यावर्षीचा गॅदरिंग सेक्रेटरी सौरभ देशपांडे यांच्या परिश्रमातूनच हा कार्यक्रम करणे शक्य झाले.

दि. ३० डिसेंबरला अंताक्षरीची फेरी पार पडली. नृत्यस्पर्धेने ह्या कार्यक्रमाची सांगता झाली. प्रथम पारितोषिक 'भारूड' योगेश वंग व ग्रुप तसेच 'घूमरो' या नृत्याला मिळाले. तसेच अनामिका व मेघा प्रभू यांनाही प्रथम पारितोषिक मिळाले.




पॉलिस्पार्क-कार्यक्रम

'Poly-Spark' मध्ये सहभाग घेतलेल्यांपैकी ज्यांना पारितोषिके मिळाली त्यांना पारितोषिके यावेळी देण्यात आली.



पॉलिस्पार्क-कार्यक्रम

'Poly-Spark' मधील सर्व कार्यक्रम प्राचार्य श्री. मुझुमदार सर व उपप्राचार्य श्री. नायक सर यांच्या प्रोत्साहनाने यशस्वीपणे पार पडले. तसेच सर्व विद्यार्थी वर्गाने उत्तम प्रतिसाद दिल्याने हे कार्यक्रम उत्तम झाले. सौ. सुषमा कुलकर्णी, कल्चरल प्रमुख यांचे मार्गदर्शन लाभल्याने कार्यक्रमात सुसूत्रता आणता आली.

पारितोषिके मिळालेल्या विद्यार्थ्यांची नावे खालीलप्रमाणे :-

**TIE KING :**
Vinay Dubal - SY EPS

**SAREE QUEEN :**
Priyanka Mirashi - FY IE

**TIE KING :**
*Runner Up* : Vishal Rao - TY Ch.

**SAREE QUEEN :**
*Runner Up* : Arti Gurunathan - TY IS

**DANCING :**

***Solo*** :
1) Megha Prabhu - TY EPS
2) Anamika - SY ISb

***Group*** :
1) Yogesh & Group - SY EPS
2) Irfan & Group - TY IE


**SINGING :**
1) Abhishek Palande - TY IE
2) Sachin Salekar - TY IS
3) Krithika - TY IE
4) Sneha Kelkar - FY IE
5) Arti Gurunathan - TY IE

**DRAMA :** Sanket, Abhishek & Group.

**विशाखा देशपांडे**
१५, जीवनसरिता, स्टेट बँकेजवळ,
आईस फॅक्टरी, नौपाडा, ठाणे.

***

## मुद्राराक्षस



एकदा
एका विनोदी मासिकाच्या कचेरीत
रखवालदारी करणारा गुरखा
धावत धावत संपादक महाशयांकडे आला
व म्हणाला,
"साहेब !
आताच मला डुलकी लागली
अन् स्वप्नात मी मुद्राराक्षसाचा खून केला !"
संपादक महाशयांनी
तडकाफडकी
गुरख्याला रखवालदारीतून बडतर्फ केलं
अन
आपल्या उपसंपादकाच्या जागी त्याची तात्काळ
नेमणूक केली !!

**प्रा. विनोद कांबळी**
वि.प्र. मंडळाची
इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, ठाणे.

***